RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

# लोकरक्षणाय

वर्ष ०३ | अंक २२५ | पृष्ठे ०८ | रू. २/-

www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | ठाणे, दिनांक मंगळवार, ०९ डिसेंबर २०२५

dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118 | 022 - 6971 1890



देशातील पहिल्या भव्य इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना... पान ३ वर

विशेष लेख

भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील... पान ४ वर

**सुविचार**

"आकाशातील ग्रह तारे जर माझं भविष्य ठरवत असतील तर माझं मनगट आणि मेंदूचा काय उपयोग."

\- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

पुणे, शिर्डी, कोल्हापूर विमानतळांवरील उड्डाणं पूर्वपदावर; प्रवासी संख्येत... पान ८ वर



वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा) पान ५ वर

विशेष उपक्रम

ध्यास सकारात्मकतेचा


## () थोडक्यात ()

### संत जगनाडे महाराज जयंती दिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिवादन



नागपूर : संत जगनाडे महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथील विजयगड या शासकीय निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, संत जगनाडे महाराज हे समाजप्रबोधनाचे ध्वजवाहक आणि संत परंपरेतील अढळ श्रद्धास्थान असणारे संत होते. समता, कार्य, भक्ती आणि ज्ञान यांची सांगड घालणारे त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत. त्यांनी समाजातील रूढीवाद, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवला आणि भक्तीच्या माध्यमातून लोकांना जागृत केले.

### विधानपरिषद तालिका सभापतींची नियुक्ती जाहीर



नागपूर : विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली. विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती सभापती प्रा. राम शिंदे यांनी सभागृहात जाहीर केली. तालिका सभापती म्हणून सदस्य सर्वश्री अमित गोरखे, कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे आणि सुनील शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभापती प्रा. शिंदे यांनी जाहीर केले.

# बीडमध्ये बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्रशासनाचा दणका

**४०० कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार?**

● बीड, दिगंबर जाधव :




बीड जिल्हा परिषदेतील सुमारे ४०० कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगात्वाची (Beed) आता थेट रुग्णालयांमध्ये तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे बनावट दिव्यांग किंवा कमी दिव्यांग असताना अधिक प्रमाणाचे प्रमाणपत्र मिळविलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असणार आहे. आत्तापर्यंत जिल्हा परिषदेतील १८ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

तुकाराम मुंडे यांनी दिव्यांग कल्याण आयुक्ताचा पदभार घेतल्यानंतर राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांच्या तपासणीचे आदेश दिले होते. त्यानुसार बीड जिल्ह्यात तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. यावेळी ४०० कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.बीड जिल्हा परिषदेमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर प्रशासनाने दणका देत १८ कर्मचाऱ्यांसह १४ शिक्षकांसह निलंबित केले. मुख्य सचिव तुकाराम मुंडे यांच्या आदेशानंतर जिल्ह्यातील प्रत्येक विभागातील दिव्यांग लाभधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. प्रमाणपत्र वेळेत न दिल्याने आणि पुरावे अपुरे असल्याने १०० हून अधिक जणांच्या चौकशीला सुरुवात झालीय.


यात १८ कर्मचाऱ्यांनी युडीआयडीआय कार्ड सादर केले नव्हते. त्यांना कार्ड सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली. मात्र तरी देखील त्यांनी कार्ड सादर न केल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. आता सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांची रुग्णालयामार्फत दिव्यांगत्व पडताळणी केली जाणार आहे. महाराष्ट्रात बनावट अपंगत्व प्रमाणपत्रांच्या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्यासाठी, महाराष्ट्र अपंग व्यक्ती विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार मोठ्या प्रमाणात पडताळणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) जितिन रहमान यांनी अनुपालन चौकशीनंतर १४ शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश दिले. राज्यभरातील अनेक लोक बनावट अपंगत्व प्रमाणपत्रांच्या आधारे सरकारी नोकऱ्या आणि योजनांचा लाभ घेत होते. बीड जिल्ह्यातील अपंग कर्मचाऱ्यांच्या पडताळणी दरम्यान, अनिवार्य अद्वितीय अपंगत्व ओळख प्रमाणपत्र (UDID) सादर न केल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या १४ शिक्षकांना निलंबित करण्यात आले. पान २ वर

## मुंबईचा एक्यूआय: शहरातील अनेक भाग 'अस्वस्थ करणारा' गटात!; हवेची गुणवत्ता २५५ वर

● मुंबई, विशाल कारंडे :

दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता वर्षानुवर्षे खालावत चालली आहे. आता या यादीत आर्थिक राजधानी मुंबईचाही समावेश झाला आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता दिल्लीइतकीच वाईट होत



चालल्याचं दिवसेंदिवस समोर येत आहे. आज सोमवारी (८ डिसेंबर) देखील शहरातील अनेक भागात हवेचा दर्जा 'अस्वस्थ करणारा' या गटात नोंदवला गेला आहे. सकाळी शहराचा एकूण एक्यूआय २००ते २५० दरम्यान नोंदवला गेला, तर काही भागात तो २५५ पर्यंत पोहोचल्याची नोंद आहे.

गेल्या आठ दिवसांचा ट्रेंड: केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि विविध हवामान संकेतस्थळांच्या नोंदीनुसार, डिसेंबरच्या पहिल्या ८ दिवसांत मुंबईत एक्यूआय बहुतेक वेळा १०० ते १८० दरम्यान राहिला. तथापि, काही दिवशी एक्यूआय २०० च्या पुढे गेला. यामुळे मुंबईकरांवर प्रदूषणाचा परिणाम अधिक झाल्याचं स्पष्ट दिसून आलं आहे. पान २ वर

## वंदे मातरम् स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आणि ऊर्जा देईल - पंतप्रधान मोदी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत हे 'वंदे मातरम्' १५० वर्षे पूर्ण होत असताना विशेष चर्चासत्राला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकसभेत वंदे मातरमवर बोलताना म्हणाले, या गीतानं आपल्याला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची प्रेरणा दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकसभेत वंदे मातरमवरवर बोलताना म्हणाले, "वंदे मातरम हा केवळ स्वातंत्र्याचा मंत्र नव्हता. त्याहूनही खूप काही होते. स्वातंत्र्य चळवळ ही मातृभूमीला गुलामगिरीच्या तावडीतून मुक्त करण्यासाठीची लढाई होती. वेदामध्ये म्हटलं आहे, 'ही भूमी माझी माता आहे आणि मी या मातीचा पुत्र आहे.' श्रीराम लंकेतून बाहेर पडताना म्हणाले होते, माता आणि आई ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे.' पान २ वर

## नाशिक-मुंबई लोकलचे स्वप्न पूर्ण होणार!

### कसारा-मुंबई, मनमाड-कसारा मार्गांवर प्रत्येकी दोन नवीन रेल्वे लाईनसाठी हिरवा कंदील

● नाशिक, सचिन कदम :

नाशिककर आणि उत्तर महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांसाठी महत्त्वाची ठरणारी मोठी घडामोड घडली आहे. मनमाड–कसारा आणि कसारा–मुंबई या मार्गांवर प्रत्येकी दोन नवीन रेल्वे लाईन उभारणीसाठी केंद्र रेल्वे प्रशासनाने औपचारिक मंजुरी दिली आहे.या निर्णयामुळे नाशिक–मुंबई लोकल सेवेसह अनेक नवीन गाड्यांसाठी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या स्लॉट समस्येचे समाधान होणार आहे. नाशिक–मुंबई लोकल सेवा सुरू करण्याबाबत तसेच नवीन एक्सप्रेस किंवा पॅसेंजर गाड्यांची वाढ करण्याबाबत प्रयत्न सुरू असताना रेल्वे प्रशासनाकडून "स्लॉट उपलब्ध नाहीत" हा प्रमुख मुद्दा सतत पुढे येत होता.मुंबई विभागाकडे येणाऱ्या विद्यमान ट्रॅकवर प्रचंड गर्दी असून, वेगवेगळ्या गाड्यांचे तासन्तास कोंडीत अडकणे, अप-डाऊनची मर्यादित क्षमता, मालगाड्यांची वाढती संख्या आणि सिग्नलिंगवरील दडपण यामुळे नवीन सेवांची अंमलबजावणी अशक्य होत होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन खासदार राजाभाऊ वाजे यांनी केंद्र व रेल्वे मंत्रालयाकडे मनमाड–कसारा आणि कसारा–मुंबई या दोन महत्त्वाच्या कॉरिडॉरवर स्वतंत्र दोन-दोन नवीन रेल्वे लाईन उभारण्याची ठोस व सातत्यपूर्ण मागणी केली. या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून रेल्वे मंत्रालयाने आता दोन्ही मार्गांवर नवीन दुहेरी रेल्वे लाईन उभारण्यास मान्यता दिली आहे. पान २ वर



> प्रथमतः सरकारचे मन:पूर्वक आभार. तसेच, नवीन लाईनच्या मंजुरीनंतर आता प्रकल्प अंमलबजावणी वेगाने व्हावी यासाठी माझा आक्रमक पाठपुरावा राहील. महत्वाचे म्हणजे यासाठी होणाऱ्या भूमिअधिग्रहन प्रक्रियेत स्थानिक शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठीही मी कटिबद्ध आहे.
>
> राजाभाऊ वाजे,
> खासदार, नाशिक

## राज्यात वाघ, बिबट्या, वन्यप्राण्यांची दहशत; हल्ल्यात १० महिन्यांत ४७ जणांचा मृत्यू

● मुंबई, विशाल पाटील :

मानवी वस्तीत वाघ, बिबट्यासह अन्य वन्यप्राण्यांचा वावर वाढला असून मनुष्यावर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. गेल्या १० महिन्यांत वाघ, बिबट्या यांसह वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ४७ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती राज्याच्या वन विभागाने दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे. गेल्या पाच वर्षांत वाघाच्या हल्ल्यात २५० तर बिबट्यांच्या हल्ल्यात ८७ अशा एकूण ३३७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती उघडकीस



आली आहे.

वाघ, बिबट्या रानडुकरे, कोल्हे, रानगवा या प्राण्यांचा जिल्हा, तालुका आणि आता शहरी भागात मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे. मानवी वस्तीत वाघ, बिबट्या, रानडुकरे, कोल्हे, तरस, अस्वल, लांडगा, माकड खोकड या प्राण्यांचा शिरकाव वाढत असून मनुष्य व पशुपक्ष्यांवर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. गेल्या पाच वर्षांत वाघ, बिबट्या, रानडुकरे, कोल्हे, तरस, रानगवा या प्राण्यांच्या हल्ल्यात तब्बल ३७७ जणांचा मृत्यू झाला आहे, त्याची धक्कादायक माहिती राज्याच्या वन विभागाने दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे. दरम्यान, वाघाच्या हल्ल्यात मानवाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत करण्यात येते, असे वन विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

**प्राण्यांच्या वस्तीत माणसांची घुसखोरी**

मुंबई शहरांसह राज्याचा विकास झपाट्याने होत असून मानवाने प्राण्यांच्या वस्तीत घुसखोरी केली आहे. त्यामुळे सहाजिकच प्राण्यांचा लोकवस्ती वावर वाढला आहे. पान २ वर

## तपोवनातील वृक्षतोड अटळ?

### आंदोलन सुरू असतानाच मंत्री गिरीश महाजनांनी खरेदी केली १५ हजार नवी झाडं!

● नाशिक, सचिन कदम :

तपोवनातील वृक्षतोड आता अटळ दिसत आहे. कारण कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी आंध्र प्रदेशातून १५ हजार झाडांची खरेदी केली आहे. एकीकडं नाशिककर तपोवनातील वृक्षतोडीच्या विरोधात आंदोलन करत आहेत. तर दुसरीकडे मंत्र्यांनी नवी झाडं खरेदी केली आहेत.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवन परिसरात साधू ग्राम उभारण्यासाठी तब्बल १८०० वृक्ष तोडली जाणार असल्याची चर्चा आहे. मात्र, या वृक्षतोडीला सर्वच स्तरातून विरोध होताना दिसून येत आहे. दरम्यान, या झाडांच्या बदल्यात १५ हजार नवीन झाडं लावली



जाणार असल्याचं आश्वासन सरकारडून देण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या झाडांच्या खरेदीसाठी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन थेट दक्षिण भारतातील राजमुद्री (आंध्र प्रदेश) इथं पोहचले. येथून त्यांनी १५ हजार झाडं खरेदी केली आहेत. अशा स्थितीत नाशिककरांची भूमिका काय असणार आहे? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

**साधू-महंतांच्या राहण्याच्या सोयीसाठी झाडांची कत्तल :** नाशकातील त्र्यंबकेश्वर इथं सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. अशा स्थितीत शहरात लाखो साधू-महंत येणार आहेत. त्यांच्या राहण्यासाठी तपोवन परिसरात तात्पुरत्या स्वरूपात साधुग्राम उभारण्यात येणार आहे. पण, तपोवनातील नेहमीची जागा अपुरी पडत असल्याचे निदर्शनाला आलं. यानंतर परिसरातील १८०० झाडं तोडण्याचा घाट नाशिक महानगरपालिकेनं घातला.

पण, याला नाशिककरांनी कडाडून विरोध करत आंदोलन उभं केलं आहे. या आंदोलनाला भाजपा वगळता सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला आहे. तसेच, अनेक कलाकारांनीदेखील झाडं तोडू नये, अशी मागणी केली आहे. पान २ वर

## संपादकीय

### वारसदार : धन - द्रव्य संपत्तीला असतात कर्माला नाही

संसारात वारसाहक्काने धन द्रव्य संपत्ती देता येते मात्र आपलं कर्म आपल्याच फेडाव लागतं त्याला इतर कोणीही वारसाहक्क नसतो.संसार म्हणजे भौतिक मायेचा विस्तार स्वार्थवश भौतिक नातेवाईक वारसदार असतात पण आपण केलेल्या कर्माला आपण सोडता इतर कोणालाही वारसदार उतरधिकारी होता येत नाही.जीवनात कर्माला पर्याय नाही. कर्म करताना निती धर्म, नैसर्गिक न्याय पाळला गेला तर सात्विक कर्म घडत आणि हेच सात्विक कर्म आपल्या जीवनाच उत्थान घडवत असतं.जीवन उत्थान होण्यासाठी अहोरात्र जागृत राहून सात्विक कर्म केले पाहिजे.जेणेकरून निसर्ग सुद्धा आपलं काही बिघडवू शकणार नाही.आत्मा अमर असुन शरिर नश्वर आहे पंचमहाभूतांचे मिळून बनलेल शरीर एक दिवस विसर्जित करण क्रमप्राप्त असत.नश्वर शरिर असताना देखिल आपण जीवनात कशा पद्धतीने आचरण करतो हे विचार कारयला नक्कीच भाग पाडणार आहे. आपल्या मुळे इतर कोणत्याही जीवाला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता काळाजी घेतली गेली पाहिजे. जीवन आवश्यक बाबीचीं साठवण करत असताना निती धर्म साक्षीदार म्हणून असले पाहिजे.मानवी मन हे अनेक इच्छा अपेक्षांचे माहेर घर असले तरी देखील आपण आपलं मन सदैव ज्ञान सदृश ठेवलं पाहिजे जेणेकरून आपल्या कडुन कोणत्याही प्रकारचे चुकीचे कर्म घडणार नाही एवढं जागृत तर आपण असलच पाहिजे.जसं कर्म तसं फळ हा निसर्गाचा नियम आहे.पण कर्म करताना हे कळत नाही हेच सगळ्यात मोठं मानवी जीवनातील दुर्दैव आहे.कर्मफळाला कोणीही अपवाद नाही.निसर्गाचा नियम कोणालाही बदलता येत नाही.महणुन आपल कर्म हे सात्विक असलं पाहिजे.सत्य निष्ठा आणि सात्विक कर्म असेल तर जेव्हा कर्मफळ मिळेल तेव्हा पश्चात्ताप करण्याची आवश्यकता पडणार नाही.सृष्टी वर अतोनात धन द्रव्य संपत्ती मिळवली तरी या पैकी काही सोबत घेऊन जाता येत नाही हे वास्तव आहे पण आपण केलेलं कर्म आपल्या सोबत येत असत.संसारातील सर्व बाबींना अनुषंगीक वारसदार ठरलेले असतात. फक्त आपण केलेलं जे कर्म आहे त्याच वारसादर मात्र आपण स्वतः सोडता इतरांना होता येत नाही. वारसाहक्काने कर्माचा वारसदार होत नाही. त्या अनुषंगाने आपलं दैनंदिन नित्य कर्म हे खुप विचार पुर्वक काळजीने केलं पाहिजे.कर्म आपला उत्तराधिकारी स्वतः निवडत असतं .आपण जसं कर्म करू तसं फळ हे निश्चित योग्य वेळी आपल्या पदरी पडत असत. फक्त मध्ये काही कालावधी असतो हा कालावधी योग्य वेळ आली कि मग मात्र कर्म फळ आपलं रूप दाखवत या मध्ये कोणतीही शक्ति अथवा ताकद बदल करू शकत नाही.फक्त थोडा वेळ उसंत मिळते.कितीही मोठा बलवान, धनवान, शक्तिवान, शक्तिशाली, सामर्थ्यवान असला तरी देखील त्याला कर्म फळातुन सुट मिळत नाही.वेळ हि कोणालाही सोडत नाही.हे वास्तव आहे ते मान्य करणं अथवा न करणं हे आपल्या ज्ञान क्षमतेवर अवलंबून असते.आपण कर्म करताना आपल्या कर्माला नितिचा आधार असलाच पाहिजे.निसर्ग योग्य वेळी सव्याज वसुल करतो .याची जाणीव ठेवून आचरण केल पाहिजे.आपली वसुली होऊ देयची नसेल तर आपला व्यवहार अगदी सात्विक सचोटीने ठेवला पाहिजे.दैनंदिन जीवनात आपण आपलं विहित कर्म करताना अंत्यंत काळजी घेण गरजेचं आहे कारण आपण जमवलेल्या संपत्तीला कोणीही वारसदार लाभु शकतो.आपण मिळवलेली संपत्ती अथवा पिढ्या न पिढ्या चालत आलेली आपल्या वाट्याची धनसंपदा वाटपावेळी ती आपण कोणालाही देऊ शकतो तो आपला वैयक्तिक अधिकार आहे.महणजे आपल्या संपत्तीचे वारसदार आपण ठरवू शकतो तो आपला अधिकार आहे. पण कर्माचे उत्तर अधिकारी म्हणून फक्त आपण स्वतःच असतो.कर्म फल कोणीही टाळू शकत नाही.मिळालेला जन्म सार्थकी लागला पाहिजे शरिराचे नाही तर आत्म्याचे कल्याण झाले पाहिजे हि जाणीव झाली तर मग मात्र नक्कीच आपण विचारपूर्वक कर्म करतो.

**- अनिकेत घनश्याम भंकाळ**

## आजची चित्रोळी



आडोशाची जाळी जेव्हां
दवांत अलगद भिजते !
नक्षीदार छतास सजवून
लटकवलेली दिसते !!

मुकुंद कुलकर्णी

# भ्रष्टाचार देशाला लागलेली किड



आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहे. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे.भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले. देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे.

असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे. देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे. ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे.

राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

**- श्याम ठाणेदार**

## पान १ वरून...

### बीडमध्ये बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांना...

४०% पेक्षा कमी अपंगत्व नसेल तर कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई अपंगत्व कोट्याअंतर्गत नोंदणीकृत कर्मचाऱ्यांची अनुपालन तपासणी केल्यानंतर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) जितिन रहमान यांनी ही कठोर कारवाई केली. बुधवारी निलंबनाचे आदेश जारी करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.जिल्हा परिषदेने त्यांच्या सर्व विभाग प्रमुखांना अपंग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

या पडताळणी प्रक्रियेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि इतर सर्व विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सीईओनी स्पष्ट केले की, यूडीआयडी कार्ड अनिवार्य आहे आणि लाभ मिळविण्यासाठी किमान ४०% अपंगत्व आवश्यक आहे. जर कोणताही कर्मचारी ४०% पेक्षा कमी अपंगत्व असूनही लाभ घेत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. चौकशीत अपात्र आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल. या प्रकारची फसवणूक खपवून घेतली जाणार नाही.

### मुंबईचा एक्यूआय: शहरातील अनेक...

१–ते ३ डिसेंबर: हवेचा दर्जा बहुतांश ठिकाणी 'मॉडरेट' (एक्यूआय १०० ते १५०)

४–ते ६ डिसेंबर : तापमान घटल्यानं आणि वारं मंदावल्यानं हवेचा दर्जा 'पुअर' ते 'अनहेल्दी' (एक्यूआय १५० ते १८०)

६ डिसेंबर : काही केंद्रांवर एक्यूआय १७६ नोंदवला गेला.

७ डिसेंबर : शहरासाठी एकत्रित एक्यूआय सुमारे १५८ ते १८० च्या दरम्यान होता, म्हणजेच मॉडरेट ते अनहेल्दी श्रेणीमध्ये होता.

८ डिसेंबर (आज) : सकाळी हवा पुन्हा 'अनहेल्दी' असल्याची नोंद झाली आहे. एक्यूआय अनेक भागांत २००तर काही ठिकाणी २५० च्या वर होता.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या मानकांनुसार,

- ■ ० ते ५० दरम्यानचा एक्यूआय 'चांगला'
- ■ ५१-१०० 'समाधानकारक'
- ■ १०१-२०० 'मध्यम'
- ■ २०१-३०० 'खराब'
- ■ ३०१-४०० 'अत्यंत वाईट'

आणि ४०१-५०० 'गंभीर' मानला जातो.

**हवामान तज्ज्ञांचं मत काय? :** भारतीय हवामान तज्ज्ञ डॉ. चिन्मय खानोलकर यांच्या मते, मुंबईतील हिवाळ्यात हवेची गुणवत्ता सुरक्षीत राहण्यासाठी आवश्यक असलेली नैसर्गिक हवा-खेळती परिस्थिती सध्या कमी आहे. रात्रीचं तापमान झपाट्याने खाली येतं आणि सकाळी सूर्य उगवल्यावरही हवेच्या खालच्या थरात प्रदूषक अडकून राहतात. हलकं वारं, समुद्रकाठचा ओलसरपणा, वाहनं व बांधकामांमधून येणारी धूळ या प्रदुषणात आणखी वाढ होते.

वाहनांची संख्या, बांधकामं आणि रस्ते कामामुळे निर्माण होणारी धूळ यामुळे PM२.५ आणि PM१० कणांची पातळी सतत उच्च राहते. डॉ. खानोलकर यांनी सांगितलं की, मुंबईतील PM२.५ कणांची संख्या डब्ल्यूएचओच्या वार्षिक मार्गदर्शक मानकांपेक्षा १४-१५ पट जास्त आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात मुंबईतील हवेची गुणवत्ता सरासरी एक्यूआय १२० च्या आसपास होती. गेल्या वर्षी याच कालावधीत हा आकडा सुमारे १४८ होता. म्हणजेच, या वर्षी थोडी सुधारणा दिसली असली तरी, हवेतील प्रदूषण मुंबईकरांच्या आरोग्यासाठी अजूनही धोकादायक आहे.

### वंदे मातरम् स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्न...

वंदे मातरम हे आपल्या महान सांस्कृतिक वारशाचा आधुनिक अवतार आहे."

**सर्वांसाठी हा एक पवित्र प्रसंग -** "येथे कोणताही नेतृत्व किंवा विरोध नाही. वंदे मातरमचे ऋण फेडण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र आलो आहोत. या गीतामुळेच आपण सर्वजण येथे एकत्र आहोत. हे ऋण फेडण्यासाठी आपल्या सर्वांसाठी हा एक पवित्र प्रसंग आहे. वंदे मातरमनं देशाला उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एकसंध केलं. आता पुन्हा एकत्र येऊन पुढे जाण्याची वेळ आली आहे. हे गीत आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आणि ऊर्जा देईल. आपण २०४७ पर्यंत आपला देश स्वावलंबी आणि विकसित करण्याचा आपला संकल्प पुन्हा सुरू केला पाहिजे.

वंदे मातरमला ५० वर्षे पूर्ण होताना भारत इंग्रजांच्या ताब्यात होता. वंदे मातरमला १०० वर्षे पूर्ण होताना भारत आणीबाणीच्या विळख्यात होता. त्यावेळी देशभक्तांना तुरुंगात टाकण्यात आले होते. वंदे मातरमची १५० वर्षे ही आपल्या भूतकाळातील अभिमानाला वंदन करण्याची संधी आहे. या गीतानं आपल्याला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची प्रेरणा दिली-पंतप्रधान, नरेंद्र मोदी

यापूर्वी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, काँग्रेसच्या निर्णयामुळे भारताच्या फाळणीची बीजे रोवली गेली. राष्ट्रगीताचे तुकडे झाले. त्यावर रवींद्रनाथ टागोरांच्या सल्ल्यावर आधारित निर्णय घेतल्याचं काँग्रेसनं स्पष्टीकरण केलं होतं. राज्यसभेत मंगळवारी 'वंदे मातरम्'वरील चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे सुरुवात करणार आहेत. 'वंदे मातरम्' चर्चेशी संबंधित वेळापत्रकानुसार लोकसभेत एकूण १० तासांचा वेळ देण्यात आला आहे. त्यापैकी सत्ताधारी एनडीएच्या खासदारांना तीन तास देण्यात आले आहेत.

**'वंदे मातरम्' आणि 'जय हिंद' शब्द न वापरण्याच्या सूचना -** तत्पूर्वी, हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच राज्यसभा सचिवालयानं संसदेत शिष्टाचार राखण्यासाठी खासदारांनी 'वंदे मातरम्' आणि 'जय हिंद' सारख्या घोषणा वापरणे टाळावे, असा सूचना दिल्या होत्या. त्यावर भारताचे स्वातंत्र्य आणि एकतेच्या प्रतीकांबद्दल एनडीए अस्वस्थ असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. 'वंदे मातरम्'बद्दल सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतभेद असल्यानं संसदेत गदारोळ होण्याची शक्यता आहे. संसदेचं हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**भाजपाची काँग्रेसवर जोरदार टीका -** भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी रविवारी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसच्या नेतृत्वावर जोरदार टीका केली. जवाहरलाल नेहरूंचा 'निर्मित वारसा' जपण्यासाठी काँग्रेसकडून निवडकपणे इतिहास जपत आण्यात आल्याचा पात्रा यांनी आरोप केला. काँग्रेस नेते नियमितपणे भाजापवर नेहरूंचे योगदान पुसून टाकल्याचा आरोप करतात. त्यावर भाजपाचे प्रवक्ते यांनी काँग्रेसकडून अनेक राष्ट्रीय आदर्शांना कमी लेखण्यात आल्याचा आरोप केला. नेहरु केंद्रित गोष्टी ठसवण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही दशकं बाजूला करण्यात आलं होतं, असा आरोप पात्रा यांनी केला.

### नाशिक-मुंबई लोकलचे स्वप्न...

नवीन लाईन मंजूर झाल्याने नाशिक–मुंबई लोकल प्रकल्पाला वास्तविक गती मिळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अनेक वर्षे तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित असलेला हा जनजीवनाशी थेट संबंधित प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने पुढे सरकला आहे.

**प्रकल्पाचे फायदे**

- ■ गाड्यांची संख्या वाढविणे सोपे होईल
- ■ लोकल सेवेसाठी आवश्यक स्लॉट उपलब्ध होतील
- ■ मालगाड्यांची हालचाल स्वतंत्र ट्रॅकवर वळवता येईल
- ■ मुंबई–नाशिक–मनमाड रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान व वेळेवर होईल

### राज्यात वाघ, बिबट्या, वन्यप्राण्यांची...

जंगलातील झाडांची खुलेआम कत्तल होत असून प्राणी आपले जीवन जगण्यासाठी मानवी वस्तीत पलायन करत आहेत. राज्यात गेल्या काही वर्षात वाघांच्या हल्ल्या पाठोपाठ बिबट्यांच्या हल्ल्यात वाढ झाली आहे. त्यामुळे आता मानव-वाघ संघर्षासोबत मानव -बिबट्या संघर्षात वाढ झाली आहे. राज्य सरकारच्या वन विभागाच्या माध्यमातून विविध उपाययोजना करण्यात येत असल्या तरी प्राण्यांच्या वस्तीत मानवाची घुसखोरी याला कारणीभूत आहे, असे प्राणीप्रेमींचे म्हणणे आहे.

**मृत्यूची आकडेवारी**

- ■ वर्ष २०२१-२२ दरम्यान वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ८४ जणांचा मृत्यू झाला.
- ■ वर्ष २०२२-२३ मध्ये ही संख्या वाढून १०९ वर पोहोचली.
- ■ वर्ष २०२३-२४ मध्ये मानव मृत्यूची संख्या ६३ इतकी नोंदवली गेली.
- ■ वर्ष २०२४-२५ दरम्यान ६८ जणांचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात बळी पडल्याची नोंद आहे.
- ■ तर २०२५-२६ या चालू वर्षात आतापर्यंत ५३ मृत्यू नोंदवले गेले आहेत.

### तपोवनातील वृक्षतोड अटळ?

**उभा राहिला न्यायाचा लढा :** पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांचा वाढता रोष पाहता, आता राज्य सरकारन तातडीनं डॅमेज कंट्रोल करायला सुरुवात केली आहे. तपोवनातील झाडाला हात लावण्यापूर्वी शहरात तब्बल १५ हजार देशी वृक्षांची लागवड केली जाईल, असं कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी जाहीर केलं आहे. यासाठी त्यांनी रविवारी (७ डिसेंबर) थेट दक्षिण भारतातील राजमुद्री (आंध्र प्रदेश) येथून १५ फूट उंचीची झाडेदेखील खरेदी केली आहेत.

**'१५ फुटाची १५ हजार झाडं लावणार' :** कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः आंध्र प्रदेशातील राजमुद्री येथे जाऊन नर्सरीमधील झाडांची पाहणी केली. तेथून पिंपळ, वड, लिंब, जांभूळ आणि आंबा यांसारखी १५ फूट उंचीची १५ हजार पूर्ण वाढ झालेली झाडे निवडण्यात आली आहेत. यातील पहिली खेप म्हणून दोन हजार झाडं येत्या आठवडाभरातच नाशिकमध्ये दाखल होणार आहेत. या झाडांचं जतन नाशिक महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत ठिबक सिंचन आणि सेंद्रिय खतांचा वापर करून केलं जाणार असल्याचं कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. सोबतच, साधूग्रामच्या जागेवर होणारं एक्झिहिबिशन सेंटरचं टेंडर रद्द करण्यात आलं आहे. आधी शहरात १५ हजार नवीन वृक्ष लावू, त्यानंतरच तपोवनातील झाडांबाबत विचार करू. झाडं तोडण्याऐवजी जास्तीत जास्त झाडांचं पुनर्रोपण करण्यावर आमचा भर असेल असंही मंत्री महाजनांनी म्हटलं आहे.

**तपोवनाचे आध्यात्मिक महत्त्व :** प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शानं पावन झालेली नाशिक नगरी आणि याच नगरीत पंचवटी भागात तपोवन परिसर आहे. वनवास काळात प्रभू रामचंद्र, लक्ष्मण आणि सीतामाता ह्याच तपोवनात अनेक वर्षे वास्तव्यास होते, असं पुराणात म्हटलं आहे. रामायणातील दंडअरण्य कांडचा मोठा भाग पंचवटीत घडला. लक्ष्मणानं शूर्पणखेचं नाक याच तपोवन परिसरात कापलं होतं. याच ठिकाणी रामाची झोपडीदेखील आहे.

आध्यात्मिक शांततेसाठी तपोवन आणि पंचवटी प्रसिद्ध आहे. इथं रामायणाशी संबंधित अनेक कथा आणि धार्मिक भावना जोडल्या गेलेल्या आहेत. याचं भागात गोदावरी नदी आणि कपिल नदीचा संगम होतो. हा परिसर दाट झाडांनी व्यापला असून यात अनेक मोठी झाडं आणि अनेक औषधी वनस्पती आहेत. दर १२ वर्षांनी होणारा सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवन हे ठिकाण अतिशय महत्त्वाचं मानलं जातं. तपोवन या नावातच तप आणि वन आल्यानं देशभरातून येणारे साधू महतांच्या राहण्याची सोय तपोवन भागात केली जाते. मात्र, प्रशासन साधूग्रामच्या नावाखाली येथील १८००झाडं तोडण्याचा घाट घालत असून याला पर्यावरणप्रेमींसह सर्वच नाशिककरांनी तीव्र विरोध केला असून आंदोलन उभं केलं आहे.

**तपोवन परिसर शहराला २५ टक्के ऑक्सिजन देतो :** पर्यावरणप्रेमींनुसार, तपोवन परिसरात वड, कडूलिंब, चिंच, जांभूळ यांसारखी भारतीय व परिसंस्थेसाठी महत्वाची झाडे आहेत. तसेच, औषधी वनस्पतीदेखील या भागात मोठ्या प्रमाणात आहेत. अनेक वृक्ष इतके जुने आणि मोठे आहेत की, त्यांना हेरिटेज ट्री म्हणूनही घोषित करता येऊ शकते. नाशिकला २५ टक्के ऑक्सिजन देणारं तपोवन हे ठिकाण असून या परिसरात ५२ प्रकारचे पक्षीदेखील आढळून आले आहेत.


पण अशा वृक्षतोडींमुळे नाशिकच्या जलसाठ्यावर आणि हवेच्या गुणवत्तेवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, अशी भीती पर्यावरण प्रेमी अमित कुलकर्णी आणि भारती जाधव यांनी व्यक्त केली आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor-Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# देशातील पहिल्या भव्य इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना उभारणीला सुरुवात

नवी मुंबई (भावना जैन) : नवी मुंबई शहर आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे जागतिक नकाशावर आले असताना करमणुकीच्या क्षेत्रातही जगाच्या नकाशावर नवी मुंबईची ठळक ओळख मिळवून देणारे महत्त्वाकांक्षी आयकॉनिक भव्य आणि बहुउद्देशीय इनडोअर करमणूक केंद्र (मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना) उभारण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. हा देशातील पहिला प्रकल्प नवी मुंबईत सिडको उभारत आहे. नाविन्यपूर्ण नगररचना आणि भविष्यवादी नियोजनामुळे देशाच्या करमणूक क्षेत्राच्या विकासयात्रेला नवी दिशा देणाऱ्या नवी मुंबईतील विमानतळ क्षेत्रालगत हा प्रकल्प उभारला जाणार असल्याचे सिडकोने नियोजन केले असून सिडकोने याबाबतची स्वारस्य अभिव्यक्ती निविदा खुल्या केल्या आहेत.

न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडनच्या ओटू अरेनाच्या धर्तीवर विकसित होणाऱ्या या बहुउद्देशीय नाट्यगृहापासून प्रेरणा घेऊन भारतातील करमणूक पायाभूत सुविधांचा दर्जा एक पायरीवर नाही तर अनेक पायऱ्यांवर जाणार आहे.या अरेनाची आसन क्षमता २० हजार प्रेक्षकांसाठी आणि २५ हजार प्रेक्षक एकावेळी उभे राहतील एवढी असणार आहे. या अरेनामध्ये संगीत मैफिली, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक सोहळे तसेच अत्याधुनिक समग्र सादरीकरणाचा अनुभवांचे



आयोजन करण्यास सक्षम असा हा देशातील पहिला भव्य इनडोअर अरेना ठरणार आहे. नवी मुंबईतील गतिमान पायाभूत सुविधा विकासामुळे हे शहर मोठ्या प्रमाणातील आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सक्षम बनत आहे.नवी मुंबईला 'लाईव्ह एन्टरटेनमेन्ट रेव्हॉल्युशन'चा केंद्रबिंदू बनवण्याच्या दिशेने हे पाऊल ऐतिहासिक ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी सिडकोने स्वारस्य अभिव्यक्ती मागवली असून ऑनलाइन दस्तऐवज ९ डिसेंबरपासून उपलब्ध राहतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. अटल सेतू ट्रान्स-हार्बर लिंक, हायस्पीड रेल्वे मार्ग आणि नवी मुंबई मेट्रोमुळे अखंड, वेगवान संपर्क. लवकरच सुरू होणारा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, ज्यामुळे करमणूक व्यवस्थापन, कलाकारांचे प्रवास आणि मीडिया प्रॉडक्शनला नवा वेग. नेरूळ जेट्टीद्वारे पर्यटन, जलवाहतूक आणि चित्रपट निर्मितीच्या व्यवसायात नव्या संधी उपलब्ध करून देईल. खारघरमधील सेंटर ऑफ एक्सलन्स (फिफा मानकांचे चार ग्राउंड्स व चार हजार आसन क्षमतेचे स्टेडियम) तसेच खारघर येथील १८ होल्सचे व्हॅली गोल्फ कोर्स, आगामी मेडिसिटी, एज्युसिटी, एरोसिटी प्रकल्पांमुळे नवी मुंबई शहर हे एकात्मिक विकासाला अधिक सक्षम करणारे शहर ठरेल. या सर्व घटकांमुळे नवी मुंबईचे क्रीडा, करमणूक, पर्यटन आणि आर्थिक क्षेत्रातील स्थान अधिक दृढ होणार आहे.

उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित हितसंबंधींसोबत भागीदारी करत जागतिक दर्जाचे ज्ञान व ऑपरेशनल क्षमता भारतात आणण्याचे सिडकोचे नियोजन आहे. हा प्रकल्प केवळ अरेनापुरता सीमित न राहता, संस्कृती, रोजगार, उद्योग, पर्यटन आणि आर्थिक चळवळींना चालना देणारा ठरणार आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, पर्यटन वृद्धी, नवीन उद्योगांची निर्मिती, नवी मुंबईला लाईव्ह एन्टरटेनमेन्ट आणि जागतिक कार्यक्रमांचे अग्रणी केंद्र बनवण्याची क्षमता, या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेने नवी मुंबईच्या 'थेट करमणूक राजधानी' बनण्याच्या प्रवासाला नवी गती मिळाली आहे.

## विठ्ठला...कोणता झेंडा घेऊ हाती...

### डोंबिवलीतील बॅनरची राजकीय गोटात चर्चा

डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) : अभिजित थरवळ यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये केलेल्या प्रवेशास तूर्तास स्थगिती देण्यात येत आहे, अशी पोस्ट डोंबिवलीचे आमदार तथा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी फेसबुकवर केली आहे. या पोस्टनंतर डोंबिवली पूर्वेकडील जिजाईनगर परिसरात बॅनर लागला आहे. या बॅनरवर विठ्ठला...कोणता झेंडा घेऊ हाती... असा आशय नमूद करण्यात आला आहे. अभिजित थरवळ यांच्या कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर लागलेला हा बॅनर साऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.गेल्या आठवड्यात मोठ्या जल्लोषात शिवसेना शिंदे गटाचे युवा गटाचे कार्यकर्ते अभिजीत थरवळ यांचा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश झाला होता. मात्र या प्रवेशाला रविंद्र चव्हाण यांच्याकडून शिवसेनेचे अभिजीत थरवळ यांच्या पक्ष प्रवेशाला



स्थगिती देण्यात आली आहे.

डोंबिवलीत शनिवारी एका व्यासपीठावर शेजारी बसून हितगुज केल्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यातील चर्चेचे दृश्य परिणाम चोविस तासाच्या आत दिसू लागले आहेत. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आपल्या शायरीतून प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांना चिमटा घेऊनही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी खासदार डॉ. शिंदे यांच्या कामाचे कौतुक केले होते. या सर्व परिस्थितीतचे दृश्य परिणाम म्हणून प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते सदानंद थरवळ यांचे चिरंजीव अभिजीत थरवळ यांच्या भाजपातील प्रवेशाला स्थगिती दिल्याचे आपल्या समाज माध्यमांतील ऑनलाईन संदेशातून रविवारी जाहीर केले.

## कल्याणमध्ये ३६ तासांच्या अखंड वाचनयज्ञात २४५२ वाचकांचा सहभाग

कल्याण (आकाश कांबळे) : युवकांना वाचनाकडे वळवण्यासाठी, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी, साहित्यिकांबाबत माहिती मिळावी, तसेच समोर येऊन बोलण्याची भीती कमी व्हावी यासाठी अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे वतीने राबवण्यात आलेल्या ३६ तासांच्या अखंड वाचनयज्ञात २४५२ वाचकांचा सहभाग दर्शवला.कल्याण येथील अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात असतात.



ही संस्था मागील ३ वर्षांपासून अखंड वाचनयज्ञ उपक्रम राबवित आहे. या उपक्रमात अभिवाचन, काव्यवाचन, लेख, ऐतिहासिक कथा, भयकथा अशा विविध साहित्य आणि साहित्यिकांच्या साहित्याची वाचन सत्रे आयोजित केली जातात. पहिल्या वर्षी या उपक्रमात ११०० वाचक सहभागी झाले होते. तर दुसऱ्या वर्षी १६७८ वाचकांनी या वाचनयज्ञात सहभाग नोंदवला होता. यंदा, या वाचनयज्ञात ६ ते ८२ अशा विविध वयोगटातील २४५२ वाचकांनी भारताचार्य चिंतामणराव वैद्य वाचन कट्टा, डॉ जयंत नारळीकर वाचनकट्टा, बाळ कोल्हटकर वाचनकट्टा या व्यासपीठावरून वाचन केले.

३६ तासांचा अखंड वाचनयज्ञ ६५ सत्रांमध्ये पार पडला. या उपक्रमांत २० सामाजिक व सांस्कृतिक संस्था आणि २६ शाळांचा सहभाग होता. या उपक्रमात मराठी भाषेप्रमाणे हिंदी, इंग्रजी, गुजराती, आगरी -कोळी, अहिराणी अशा विविध भाषा आणि बोलीतील कथा, कविता, एकांकिका, स्फुटलेखन यांचे वाचन करण्यात आले.

## ठाण्यात तीन दिवस ३० टक्के पाणी कपात; कोणत्या भागांना बसणार टंचाईच्या झळा, जाणून घ्या

ठाणे (सम्यक कासारे) : ठाणे महापालिका स्वतःच्या योजनेसाठी भातसा नदीवरील पिसे बंधाऱ्यातून पाणी उचलून त्याचा शहरात पुरवठा करते. हा शहरातील सर्वात मोठा पाणी पुरवठ्याचा स्रोत मानला जातो. ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे बंधारा येथून टेमघर जलशुद्धीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी एक हजार मिमी व्यासाची जलवाहिनी कल्याण फाटा येथे महानगर गॅसच्या कामांमध्ये शनिवार सकाळी नादुरुस्त झाली आहे. या जलवहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू असले तरी त्यास वेळ लागत असल्यामुळे पुढील तीन दिवस ३० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना पाणी टंचाईच्या झळा बसणार आहेत. ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २७ लाख इतकी आहे. शहरासाठी प्रतिदिन ६२१ दशलक्षलीटर इतक्या पाण्याची गरज आहे. परंतु शहराला प्रत्यक्षात दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा होतो. त्यामध्ये महापालिकेच्या स्वत:च्या पाणीपुरवठा योजनेतून २५० दशलक्ष लीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लीटर, स्टेम कंपनीकडून ११५ दशलक्ष लीटर आणि बृहन्मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. असे असले तरी वाढत्या लोकवस्तीमुळे शहरात पाणी टंचाईची समस्या निर्माण होत आहे. यावर मात करण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाकडून वाढीव पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**ठाण्यात ३० टक्के पाणी कपात**

ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे बंधारा येथून टेमघर जलशुद्धीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी एक हजार मिमी व्यासाची जलवाहिनी कल्याण फाटा येथे महानगर गॅस च्या कामांमध्ये शनिवार सकाळी नादुरुस्त झाली आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम मागील दोन दिवसापासून सुरू आहे. परंतु जलवाहिनी जुनी व प्रिस्ट्रेस काँक्रीट पद्धतीची असल्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी आणखी तीन दिवस वेळ लागण्याची शक्यता आहे. या कारणास्तव ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा कमी झाला असून शहरांमध्ये ३० टक्के पाणी करण्यात लागू करण्यात येत आहे.

**या भागात पाणी कपात होणार**

मुंबई महापालिकेकडून ठाणे शहराला ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा होतो. या पाण्याचे वितरण शहरातील किसन नगर १ व २, वागळे इस्टेट, इंदिरा नगर, कोपरी, गावदेवी, बाळकुम आणि घोडबंदरच्या काही भागात करण्यात येते. तर, दिवा भागात एमआयडीसीकडू पाणी पुरवठा करण्यात येतो. ठाणे महापालिकेच्या स्वत:च्या पाणीपुरवठा योजनेतून ठाणे शहर, कळवा, मुंब्रा आणि घोडबंदर भागात पाणी पुरवठा करण्यात येतो. या भागांच्या पाणी पुरवठ्यात ३० टक्के कपात लागू झाली आहे.

## गुन्ह्याच्या तात्काळ तपासासाठी न्यायवैद्यक वाहन कल्याण डोंबिवली पोलिसांच्या ताफ्यात

कल्याण (गणेश बागडे) : गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळावरून तात्काळ वस्तुस्थिती दर्शक भौतिक, जैविक, रासायनिक पुरावे गोळा करून त्या आधारे पोलिसांना तात्काळ गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी साहाय्य व्हावे, या विचारातून शासनाने ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या माध्यमातून कल्याण डोंबिवली पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज एक न्यायवैद्यक वाहन उपलब्ध करून दिले आहे.

खून, हाणामारी, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्या ठिकाणी कल्याण पोलीस परिमंडळातील न्यायवैद्यक वाहन तातडीने गुन्हा घडल्याच्या ठिकाणी



जाईल. या वाहनात न्यायवैद्यक विषयक तज्ज्ञ असलेल्या आठ जणांचे एक पथक आहे. हे पथक घटनास्थळावरून गुन्ह्याला पुरक असे सबळ भौतिक, जैविक, रासायनिक, दृश्य सदृश्य पुरावे जमा करील. त्याचे तात्काळ विश्लेषण करून त्याचा अहवाल स्थानिक पोलिसांना उपलब्ध करून देईल. त्यामुळे पोलिसांचा तपासाचा मार्ग मोकळा होणार आहे, असे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

कल्याणमधील महात्मा फुले पोलीस ठाणे, खडकपाडा, बाजारपेठ, कोळसेवाडी, डोंबिवलीतील विष्णुनगर, रामनगर, मानपाडा आणि टिळकनगर पोलीस ठाण्यातील पोलिसांना या न्यायवैद्यक प्रयोगशाळा वाहनाचा उपयोग होणार आहे. यापूर्वी गुन्हा घडल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणचे सबळ पुरावे उपलब्ध करून देऊन ते अधिकच्या तपासणीसाठी मुंबई, ठाण्यात न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविले जात होते. न्याय वैद्यक प्रयोगशाळेतून तज्ज्ञांचा अहवाल येईपर्यंत पोलिसांना तपासाची पुढील कोणतीही कृती करता येत नव्हती.

आता कल्याणमध्ये हे न्यायवैद्यक वाहन उपलब्ध झाल्याने पोलिसांना घटना घडल्यानंतर काही तासात गुन्हा घडल्याचा अहवाल उपलब्ध होणार आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपींना अटक करणे. त्यांच्या विरूध्दचा तपास पूर्ण करून न्यायालयात विहित वेळेत आरोपपत्र दाखल करण्याचे काम या न्यायवैद्यक वाहनामुळे शक्य होणार आहे. तसेच या वाहनामुळे अधिकाधिक गुन्हे उघडकीस आणणे शक्य होणार आहे, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.हे वाहन चोवीस तास पोलिसांसाठी उपलब्ध असणार आहे. दिवसा आणि रात्री अशा दोन पाळयांमध्ये चार जणांचे एक पथक या न्यायवैद्यक वाहनात कर्तव्यावर असणार आहे. गुन्हा घडल्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यातून या न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी येण्यासाठी पोलिसांकडून संपर्क करण्यात येणार आहे.

## ठाण्यात आंबेडकर प्रतिमेजवळ संशयास्पद जादूटोणा साहित्य; नागरिक संतप्त

### वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

ठाणे (विशाल पाटील) : येथील वागळे इस्टेट भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा आणि चबुतऱ्या जवळ जादूटोणा करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ५ आणि ८ डिसेंबरला हा प्रकार झाल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, वागळे इस्टेट येथील संत ज्ञानेश्वर नगर भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणि चबुतरा आहे.



तक्रारदार नेहमी प्रतिमा आणि चबुतऱ्याची साफसफाई करतात. ५ डिसेंबरला सायंकाळी ते सफाई करत असताना त्यांना प्रतिमेच्या मागील बाजूस एका कागदामध्ये पीठाने बनविलेल्या बाहुल्या आढळून आल्या. त्या बाहुल्यांवर हळद, कुंकु होते. या घटनेनंतर सर्वजण एकत्र आले. त्यांनी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात जाऊन निवदेन दिले.८ डिसेंबरला मध्यरात्री १२ वाजता तक्रारदार हे प्रतिमा आणि चबुतऱ्याची स्वच्छता करत असताना पुन्हा पीठाने बनविलेल्या बाहुल्या आढळून आल्या. यानंतर येथील नागरिकांनी एकत्र येऊन याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३(२) आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे कलम २९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## मनोरुग्णालयामध्ये शेकडो वृक्षांची हरकती येण्याआधीच कत्तल; शरद पवार गटाने केली गुन्हा दाखल करण्याची मागणी

ठाणे (रोहित जैसवार) : ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जागेत विस्तारीत रेल्वे स्टेशन आणि मनोरुग्णालयाची विस्तारीत इमारत उभारणीसाठी १६१४ वृक्षांपैकी ७२४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने ठाणे महापालिकेकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. मात्र, या वृक्ष तोडीबाबत नागरिकांच्या हरकती येण्यापुर्वीच येथील शेकडो वृक्षांची कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक बाब राष्ट्रवादी शरद पवार गटाने पुढे आणली आहे. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांसह डोळेझाक करणाऱ्या ठाणे पालिकेच्या वृक्षप्राधिकरण अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या मनोरुग्णालयाच्या जागेत विस्तारीत रेल्वे स्टेशन आणि मनोरुग्णालयाची विस्तारीत इमारत उभारणीचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी मनोरुग्णालय परिसरातील एक हजार ६१४ वृक्षांपैकी ७२४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने ठाणे महापालिकेकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. या प्रस्तावात ३०३ वृक्ष तोडले जाणार आहेत तर, उर्वरित ४२१ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे. असे असले तरी पुनर्रोपणाचे ठिकाण, देखभाल आणि जगण्याचे प्रमाण याबाबत मात्र कोणतीही स्पष्टता नाही. या वृक्षांमध्ये फणस, कैलासपती, अशोक, आंबा, बदाम, शेवगे, नारळ, ताड, साग, भोकर, कांचन, अनंता, बेहरी माड, कडुलिंब, चाफा, उंबर यासारख्या विविध वृक्षांचा सामावेश आहे. या भागातील हरित पट्टा नष्ट होणार असल्यामुळे त्यावरून टिका होत आहे.



पर्यावरणप्रेमींमधूनही नाराजीचा सूर उमटत आहे. दरम्यान, वृक्षतोड होणाऱ्या परिसराची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी केली. या पाहणीनंतर अधीक्षक नेताजी मुळीक यांची भेट घेऊन निवेदन दिले. या पाहणीमध्ये अनेक ठिकाणी आधीच वृक्षतोड झाल्याचे आणि अतिशय जुनी झाडेही तोडण्यात आली असल्याचे दिसून आले. तसेच हरकती येण्यापूर्वीच शेकडो झाडांची कत्तल करण्यात आल्याचा दावा प्रधान यांनी केला आहे.

देशातील सर्वात मोठे मनोरुग्णालय या ठिकाणी उभे राहणार आहे. किंवा रेल्वेचे विस्तारीकरण होणार आहे, याचे आम्हाला कौतूक आहेच. किंबहुना, विकासाचे आम्ही स्वागतच करीत आहोत. पण, शहरात उरलेली शेवटची वनराई नष्ट करण्यात येत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे, याबाबत विचारणा केल्यानंतर ठाणे पालिकेचे अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. २४ नोव्हेंबरला वृक्षतोड करण्याबाबत हरकती मागविल्या जात आहेत आणि त्या आधीच झाडे तोडली जात आहेत. झाडाच्या फांद्या तोडायच्या असतील तरी परवानगी घ्यावी लागते. इथे परवानगीच्या आधीच कत्तल करण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश ओक यांनी झाडे तोडणे हे खुनासारखेच आहे, असे म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय असताना जर वृक्षतोड होत असेल तर संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, या संदर्भात आपण पोलीस ठाण्यात पत्र देणार आहोत, असेही प्रधान म्हणाले.

**हा परिसर म्हणजे ठाण्याचे फुप्फुस**

सबंध ठाणे उजाड झालेले असताना फक्त याच परिसरात हिरवळ आहे. आज ठाण्याचा प्रदूषण मानक दर १६० च्या घरात आहे. त्यामुळे ठाण्याला प्राणवायु पुरवणारा हा परिसर म्हणजे शहराचे फुप्फुस असताना ते उजाड केले तर किती धोक्याचे होईल? याचा विचार करून ठाणेकर नागरिकांनीच रस्त्यावर उतरावे. ठाणेकर पर्यावरण प्रेमींच्या नेतृत्वात आम्ही झाडे वाचविण्यासाठी रस्त्यावर येऊ, असेही मनोज प्रधान म्हणाले.

# भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव



देशभरातील प्रशासन, सार्वजनिक सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायव्यवस्था आणि नागरिक, समाज यांचे पारस्परिक नाते जेव्हा भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रकरणांमुळे प्रभावित होते, तेव्हा त्याचा परिणाम केवळ आर्थिक किंवा कायदेशीर मर्यादेत मर्यादित राहत नाही, तर सामाजिक संरचना, विश्वास, पारदर्शकता आणि न्याय या मूल्यांवर खोलवर दिसून येतो. २०२३ मधील National Crime Records Bureau (NCRB) च्या अहवालानुसार, भारतात राज्यातील भ्रष्टाचारविरोधी यंत्रणांकडून नोंदवलेली प्रकरणे ४,०६९ होती, ज्यात सुमारे ७१ टक्के प्रकरणे "ट्रॅप" प्रकारात होती, म्हणजे लाच देताना किंवा घेताना आरोपी रंगेहात पकडले गेले. या आकड्यांमागील वास्तव असे आहे की, भ्रष्टाचार फक्त काही प्रकरणांपुरता मर्यादित नाही; तर मोठा भाग अजूनही समाजात लपलेला आहे. "ट्रॅप" प्रकारात पकडलेली प्रकरणे हे फक्त टोकाचे उदाहरण आहेत. हजारो प्रकरणे, जिथे भ्रष्टाचार घडतो पण नोंद होत नाही, अशा व्यवहारांचा समावेश या आकड्यांमध्ये नाही. प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती, अनधिकृत शुल्क, अधिकारांवर दबाव, सेवा-परवाना प्रक्रियेत अनियमितता हे भ्रष्टाचाराचे वास्तविक रूप आहे, जे पकडले जात नाही, पण समाजावर खोल परिणाम करते.

पारंपरिक भ्रष्टाचारापेक्षा आजच्या काळात भ्रष्टाचाराचे स्वरूप बदलले आहे. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, डिजीटल फसवणूक, व्यावसायिक व्यवहारातील भ्रष्टाचार हे गंभीर प्रमाणात वाढले आहेत. २०२३ मध्ये आर्थिक गुन्ह्यांची नोंद २०२२ च्या तुलनेत ६ टक्क्यांनी वाढली, तर सायबर गुन्ह्यांमध्ये ३१.२ टक्क्यांची वाढ झाली असून, एकूण ८६,४२० प्रकरणे नोंदली गेली. या सायबर प्रकरणांपैकी अंदाजे ६९ टक्के प्रकरणे फसवणूक हेतूची होती. हे दर्शवते की डिजिटल व्यवहार, आर्थिक व्यवहार, ऑनलाईन सेवांचा दुरुपयोग हे भ्रष्टाचाराचे नवे रूप घेत आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, जेव्हा सार्वजनिक यंत्रणा पारदर्शक नसतात, उत्तरदायित्व राखत नाहीत आणि नागरिकांचा विश्वास घटतो, तेव्हा लोक वैध प्रक्रियांच्या ऐवजी अवैध मार्गांकडे वळतात. लाच, घोटाळा, प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती व्यवहार. हे फक्त व्यक्तिगत नैतिकतेचा प्रश्न नाही; ही संस्थात्मक आणि सामाजिक समस्या बनते. अशा परिस्थितीत, गरीब, अल्पसंख्याक, मागासलेले वर्ग हे सर्वात जास्त प्रभावित होतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण किंवा शहरी गरीब लोकांना सरकारी सेवा, परवाने, योजना मिळवण्यासाठी आवश्यक माहिती, संपर्क, संसाधने नसतात. त्यामुळे त्यांना अवैध मार्गाचा अवलंब करावा लागतो. परिणामी, सामाजिक विषमता वाढते, न्याय कमी होतो आणि समान संधींचा अभाव निर्माण होतो. भ्रष्टाचारामुळे हे सामाजिक असमानता आणि विषमता आणखी खोलवर रुजते.

शहरी व ग्रामीण परिस्थितींचा आढावा घेतल्यास, ग्रामीण भागात भ्रष्टाचाराचे स्वरूप मुख्यतः सरकारी योजनांमध्ये घोटाळा, पंचायत स्तरावरील गैरव्यवहार, जमीन व्यवहारातील अनियमितता, परवाने मिळवण्यात रस्सीखेच इत्यादी प्रकारात दिसते. शहरी भागात भ्रष्टाचार आर्थिक व्यवहार, व्यावसायिक व्यवहार, परवाने, सार्वजनिक सेवा, ऑनलाईन व्यवहार यामध्ये अधिक प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील लोकांना माहिती व साक्षरतेचा अभाव असल्यामुळे ते अधिक प्रभावित होतात, तर शहरी भागातील लोक अधिक जागरूक असले तरी आर्थिक गती व व्यावसायिक दबावामुळे भ्रष्टाचार अधिक तंत्रसंपन्न स्वरूपात दिसतो.

आर्थिक गुन्हे आणि सायबर गुन्ह्यांमुळे फक्त व्यक्ती प्रभावित होत नाहीत, तर संस्था, उद्योग, समाज, आर्थिक व्यवहार, रोजगार, सार्वजनिक विश्वास हे सर्व प्रभावित होतात. डिजिटल व्यवहारातील फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, ऑनलाईन आर्थिक फ्रॉड हे नागरिकांचे रोजचे जीवन धोक्यात टाकतात. यामुळे सामाजिक विश्वास, आर्थिक स्थैर्य, पारिवारिक व सामुदायिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम होतो.

भ्रष्टाचाराचा एक महत्त्वाचा सामाजिक परिणाम म्हणजे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवर असलेला विश्वास घटणे. जेव्हा लोक अनुभवतात की सरकारी योजना, परवाने, सेवांमध्ये पारदर्शकता नाही, तर ते न्याय मिळवण्यासाठी किंवा आवश्यक सेवा घेण्यासाठी भ्रष्ट मार्ग स्वीकारतात. परिणामी, समाजातील नैतिक मूल्ये कमजोर होतात, पारदर्शकता आणि जवाबदारी यांचा अभाव निर्माण होतो, आणि सामाजिक ढांचा ढासळतो.

शिक्षण आणि जागरूकता यांचा अभाव देखील भ्रष्टाचार वाढवण्यास हातभार लावतो. शिक्षणात कमी, सामाजिक साक्षरतेत कमतरता, नागरिक अधिकारांची माहिती नसणे हे घटक लोकांना भ्रष्टाचाराच्या जाळयात सहज ओढून नेतात. जागरूक नागरिक फक्त स्वतःसाठीच नव्हे, तर सामाजिक बदलासाठीही महत्त्वपूर्ण आहेत.

संस्थात्मक दोष देखील भ्रष्टाचार वाढवतात. प्रशासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये पारदर्शक प्रक्रिया आणि जवाबदारी सुनिश्चित न केल्यास, भ्रष्टाचाराची पद्धत कायम राहते. दोषी पकडणे आणि दंड देणे आवश्यक आहे, पण पुरेसे नाही. सुधारणा ही प्रणालीत बदल, जवाबदारी वाढवणे, सार्वजनिक सहभाग सुनिश्चित करणे आणि सामाजिक मूल्यांची प्रतिष्ठा करण्यामध्ये आहे.

डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ऑनलाईन फसवणूक, आर्थिक फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, आर्थिक फ्रॉड हे सर्व नागरिकांसाठी गंभीर धोका आहेत. डिजिटल सुरक्षा, साक्षरता, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि तत्पर न्यायव्यवस्था ह्या उपाययोजना करता येतील.

जागतिक दृष्टिकोनातून पाहता, भ्रष्टाचार ही एक सार्वत्रिक समस्या आहे. आंतरराष्ट्रीय पारदर्शकता (Transparency International) च्या अहवालानुसार, भारताचा भ्रष्टाचार संदर्भातील जागतिक स्थान स्थिर आहे, परंतु विविध राज्यांमध्ये बदल मोठ्या प्रमाणावर आहेत. भ्रष्टाचाराविरोधी धोरणे, प्रशिक्षण, डिजिटल ट्रॅकिंग, पब्लिक फॉरम्स आणि नागरिकांचा सहभाग हे उपाय अनेक देशांमध्ये प्रभावी ठरत आहेत. भारतातही याची अंमलबजावणी आवश्यक आहे.

सामाजिक स्तरावर, भ्रष्टाचारामुळे विषमता वाढते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग, अल्पसंख्याक, महिला, वंचित समुदाय हे सर्व भ्रष्टाचाराचे बळी ठरतात. सरकारी योजनांचा लाभ मिळविणे अवघड होते, सेवांमध्ये गती नसते, आणि त्यांचे जीवनमान घटते. परिणामी, समाजातील सामाजिक असमानता अधिक खोलवर रुजते. भ्रष्टाचाराचा प्रभाव आर्थिक विकासावरही पडतो. गुंतवणूक कमी होते, व्यवसायिक वातावरण अनिश्चित बनते, सेवा वितरण धीमे होते, आणि विकासाच्या योजनांचा परिणाम कमी होतो. परिणामी, देशाची आर्थिक स्थिरता वर्धित होत नाही, तर सामाजिक आर्थिक विषमता वाढते.

भ्रष्टाचारावर मात करण्यासाठी उपाययोजना बहुआयामी असाव्यात. यात शिक्षण, जागरूकता, पारदर्शकता, जबाबदारी, डिजिटल सुरक्षा, आर्थिक न्याय, नागरिकांचा सहभाग आणि संस्थात्मक सुधारणा यांचा समावेश आवश्यक आहे. याशिवाय, सरकारी धोरणे प्रभावी करणे, ऑनलाईन सेवा सुधारित करणे, फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा मजबूत करणे, आणि दोषींवर त्वरित कारवाई करणे हे देखील महत्त्वाचे आहेत.

९ डिसेंबर रोजी असणारा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो आपली सामाजिक जबाबदारी, सार्वजनिक मूल्ये, पारदर्शकता, न्याय आणि सुरक्षित समाज यांचा आढावा घेण्याचा दिवस आहे. जर आपण फक्त दोषी पकडण्यावर अवलंबून राहिलो, तर बदल होणार नाही. परंतु, जर नागरिक जागरूक राहिले, सामाजिक मूल्यांचे रक्षण केले आणि संस्थात्मक सुधारणा केली, तरच बदल शक्य आहे. भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव फक्त आकडेवारी नाही; हे आपल्या समाजाची वास्तव स्थिती आहे. त्यावर विचार करून आणि बदलासाठी भूमिका घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजात पारदर्शकता, जवाबदारी, समान संधी, साक्षरता, डिजिटल साक्षरता, आर्थिक न्याय हे मूल्य रुजविणे आवश्यक आहे. जर नागरिक आणि संस्था यांनी एकत्र येऊन बदलासाठी काम केले, तर भ्रष्टाचार कमी होईल, सामाजिक न्याय साधला जाईल, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास सुसंगत होईल. बदल फक्त आकडेवारीत दिसला पाहिजे असे नाही, तर जीवनाच्या प्रत्येक स्तरावर अनुभवायला हवा.

**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# समाजवादाला आधुनिक होणे आवश्यक

स्वातंत्र्यानंतर संविधानात समाजवाद स्वीकारल्यामुळे, संपत्ती आणि समृद्धीकडे पाहण्याचा दृष्टिकोन संकुचित आणि काहीसा नकारात्मक बनला होता. स्वातंत्र्यपूर्व काळातील काही नेत्यांच्या साधेपणाच्या ढोंगामुळे दारिद्र्य आणि त्याग याला एक वेगळी प्रतिष्ठा मिळाली. पैसा,संपत्ती असणे,हे ऐश्वर्याचा भाग मानले जात असताना, अचानक गरीब नसतानाही गरीबासारखे राहणे हे एक प्रकारचे नैतिक प्रमाणपत्र बनले. इसवीसन २००० पर्यंत ही मानसिकता समाजात मोठ्या प्रमाणात रूजली होती.त्यामुळे देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या उद्योजक घराण्याकडे चोर किंवा दरोडेखोर म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढली. लायसन्स राजच्या काळात सरकारी अधिकारी आणि राजकीय नेत्यांना पोसल्याशिवाय काम करणे शक्य नव्हते,ही एक कटू वस्तुस्थिती होती,ज्यामुळे उद्योगपतींबद्दलचा हा संशय काही प्रमाणात योग्यही वाटत होता.परंतु आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.आपण एका नवीन आर्थिक युगात उभे आहोत,जिथे ही जुनी आणि नकारात्मक मानसिकता त्वरीत त्यागणे अत्यंत आवश्यक आहे.

आपण जर आधुनिक भारताच्या खऱ्या सामर्थ्यांचा विचार केला,तर त्याची प्रचिती आपल्याला उद्योगांच्या अभूतपूर्ण योगदानामध्ये मिळते.३००० ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचे उत्पादन, आयुष्मान भारत अंतर्गत ५० कोटी भारतीयांना ५ वर्षासाठी मोफत सुविधा,१५००० किमी राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम,१५ नवीन आयआयटी आणि दहा नवीन एम्सची निर्मिती या व अशा अन्य अनेक बाबींचा त्यामध्ये समावेश होतो. त्यासाठी झालेल्या कोट्यावधी रूपयांचा खर्चाची आकडेवारी पाहता ती देशातील संपत्ती निर्मितीच्या विरोधातील सर्व नकारात्मक विचारांना छेद देणारी आहे.

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये मुकेश अंबानी (रिलायन्स) आणि गौतम अदानी (अदानी समूह )या दोन औद्योगिक समूहांनी मिळून,कर रूपात, सरकारच्या तिजोरीत २ लाख ६१ हजार कोटी रूपये ( $ ३१.३ अब्ज डॉलर ) इतकी भर घातली आहे.हा कर जगातील अनेक सार्वभौम देशांच्या संपूर्ण वार्षिक सरकारी उत्पन्न आणि वार्षिक संरक्षण बजेटपेक्षाही जास्त आहे.ही आकडेवारी केवळ त्यांच्या व्यवसायाच्या प्रचंड यशाचे द्योतक नाही,तर हे भारताच्या स्वयंपूर्णतेचे आणि आर्थिक ताकदीचे सर्वांत मोठे प्रतीक आहे. पण हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, अंबानी आणि अदानी ही केवळ दोन उदाहरणे आहेत. टीसीएस,इन्फोसिस,जिंदाल,वेदांता,एचडीएफसी बँक,लार्सन अँड टुब्रो अशा अनेक बँका आणि कंपन्यांचा करभरणाही लाखो आणि कोटींमध्ये जमा होतो,जो भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ही कररूपात मिळालेली प्रचंड रक्कम महामार्ग,गरीबांसाठी आरोग्य सुविधा, सीमावर्ती भागाचा विकास,आणि अंतराळ तंत्रज्ञान अशा अनेक राष्ट्रीय हिताच्या प्रकल्पांसाठी वापरली जाते.

जेव्हा देशाच्या विकासासाठी असा अभूतपूर्व आर्थिक आधार मिळतो,तेव्हा काही घटक त्या विरोधात उभे राहतात.यामध्ये विदेशी लॉबी,अंतर्गत टूल -किट वाले गट किंवा मार्क्स-माओ विचारसरणीतून प्रेरित असलेले अर्बन नक्षलवादी यांचा समावेश होतो.हे लोक संपत्ती निर्मितीला विरोध करतात,पण त्याच व्यवस्थेत ते सुखनैव जगतात.ज्या मार्क्सवादाचा ते पुरस्कार करतात,त्या विचारसरणीने स्वीकारलेल्या देशांमध्ये (अपवाद वगळता)तेथील कॉम्रेड अक्षरशः भिकेला लागलेले आहेत.संपत्ती निर्माण करणाऱ्या आणि लाखो लोकांना रोजगार देणाऱ्या उद्योगांचे यश त्यांना खुपते. चीन आणि व्हिएतनामसारखे देशही आता सत्ता टिकवण्यासाठी साम्यवाद आणि प्रत्यक्षात देश चालविण्यासाठी भांडवलशाही(कॅपिटलिझम) यांचा वापर करत आहेत.याचा अर्थ स्पष्ट आहे- संपत्ती निर्मितीला विरोध करणाऱ्या लोकांकडे देशासाठी कोणतीही रचनात्मक योजना किंवा उपाय नसतो.त्यामुळे सामान्य नागरिक म्हणून, आपण या मार्क्सवादी टोळयांपासून आणि त्यांच्या उद्योगविरोधी प्रचारापासून सावध राहायला हवे.


आजचा खरा भारत कॉर्पोरेट इंडियाच्या मजबूत पायावर उभा आहे.या कंपन्यामुळेच कोट्यावधी तरूणांना रोजगार मिळतो आणि देशात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण होतात.

या उद्योगांच्या यशाचा गौरव करणे,हे भारताच्या सामर्थ्याचा गौरव आहे.एक सक्षम आणि स्वयंपूर्ण देश, मजबूत आणि जागतिक दर्जाच्या उद्योगांवरच उभा राहतो.त्यामुळे या सर्व बाबींकडे आपण आता एका सकारात्मक आणि गौरवशाली दृष्टीने पाहिले पाहिजे.जुनी गरिबीचे उदात्तीकरण करणारी मानसिकता आता पूर्णपणे बदलण्याची वेळ आली आहे.नव-भारत उभारणीसाठी कॉर्पोरेट इंडियाचा हा अभूतपूर्व आधार आपल्याला पुढील यशस्वी वाटचालीस प्रेरणा देणारा आहे.

**- प्रशांत बाफना**

# छातीतील जळजळ दूर करतील हे सोपे घरगुती उपाय

अन्न खाल्ल्यानंतर अनेकदा छातीत जळजळ सुरू होते. ही एक सामान्य समस्या आहे जी बऱ्याच लोकांना त्रास देते. वास्तविक, अन्न पचनाच्या प्रक्रियेत, आपले पोट असे ऍसिड तयार करते जे अन्न पचण्यास मदत करते. पण कधी कधी हे ॲसिड जास्त प्रमाणात तयार होते त्यामुळे छातीत जळजळ होण्याचा त्रास होतो.यासाठी लोक सहसा औषधे घेतात. पण काही घरगुती उपायांनीही आपण छातीत जळजळ होण्याची समस्या दूर करू शकता. ॲसिडिटी किंवा छातीत जळजळ दूर करण्यासाठी काही प्रभावी घरगुती उपाय सांगणार आहोत .चला तर मग जाणून घेऊ या.



**१. आलं** - पोटाच्या जळजळीत आल्याचे सेवन करणे खूप फायदेशीर मानले जाते. जेवल्यानंतर छातीत जळजळ होण्याची तक्रार असल्यास, जेवणानंतर आल्याचा छोटा तुकडा चघळा किंवा आल्याचा चहा बनवून प्या. यामुळे छातीत जळजळ होण्यापासून लवकर आराम मिळेल.

**२. ओवा** - ॲसिडिटी किंवा पोटात जळजळ झाल्यास आपण ओव्याच्या पाण्याचे सेवन करू शकता. यासाठी एक चमचा ओवा एक कप पाण्यात उकळा. पाणी अर्धे झाल्यावर गॅसवरून काढून थंड होऊ द्या. पाणी थंड झाल्यावर त्यात काळे मीठ टाकून प्या. असे केल्याने ॲसिडिटीच्या समस्येपासून लवकरच सुटका होईल.

**३. ऍपल सायडर व्हिनेगर** - ऍपल सायडर व्हिनेगर हा देखील छातीत जळजळ दूर करण्यासाठी एक प्रभावी घरगुती उपाय आहे. याच्या सेवनाने पोटातील ऍसिडची पातळी कमी होण्यास मदत होते. यासाठी एक चमचा सफरचंद सायडर व्हिनेगर एक ग्लास पाण्यात मिसळून प्या.

**४. गूळ** - जेवणानंतर गोड म्हणून गूळ दिला जातो . गूळ आपल्या पोटासाठी खूप फायदेशीर मानला जातो. हे पचन प्रक्रियेला गती देते आणि पोटात ऍसिड तयार होण्यास प्रतिबंध करते. जर आपण ॲसिडिटीच्या समस्येने हैराण असाल तर जेवणानंतर थोडा गूळ खाऊन एक ग्लास पाणी प्या.

**५. कोरफड** - कोरफड आपल्या आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी किती फायदेशीर आहे हे माहिती असेलच. पोटाशी संबंधित समस्यांमध्ये कोरफडीच्या रसाचे सेवन फायदेशीर ठरते. छातीत जळजळ होत असेल तर जेवणाच्या अर्धा तास आधी एक चतुर्थांश कोरफडीचा रस प्या.

**६. ज्येष्ठमध** - आयुर्वेदात ज्येष्ठमध हे अत्यंत फायदेशीर औषध मानले जाते. छातीत जळजळ होण्याच्या समस्येवर ज्येष्ठमधचे सेवन केल्याने लगेच फायदा होतो. यात अनेक आयुर्वेदिक घटक असतात जे छातीत जळजळ दूर करण्यास मदत करतात. ज्येष्ठमध बारीक करून बारीक भुकटी बनवा आणि त्याचे नियमित सेवन करा. असे केल्याने छातीत जळजळ होण्याची समस्या दूर होईल.

**७. तुळस** - तुळशी नैसर्गिक गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. तुळशीला अनेक रोगांवर रामबाण औषध मानले जाते. छातीत जळजळ होत असेल तर सकाळी उठून तुळशीची काही पाने चावा. यामुळे पोट दिवसभर थंड राहते आणि गॅस किंवा जळजळ होण्याची कोणतीही तक्रार होणार नाही.

**८. लिंबू** - लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. छातीत जळजळ होत असल्यास लिंबू आणि काळे मीठ पाण्यात मिसळून प्या. यामुळे पित्ताचा रस तयार होतो, जो अन्न पचवण्याचे काम करतो. असे केल्याने छातीत जळजळ होणार नाही.

# सावधान !; नेलपॉलिशमुळे नखं होतात डॅमेज

स्टायलिश दिसण्यासाठी टापटीप राहणं महत्वाचे आहे. यात फक्त कपडेच महत्वाचे नसतातं तर तुमचा सगळा लूकच महत्वाचा असतो. यामुळे महिला हात सुंदर दिसण्यासाठी नखांना नेलपॉलिश लावतात. विविध रंगाच्या शेड्समुळे नखं सुंदर आणि आकर्षक दिसतात. पण जर ही नेलपॉलिश तुम्ही नखांवर जास्त दिवस ठेवली तर मात्र तुमची नखं कायमची डॅमेज म्हणजेच खराब होऊ शकतात.

**नखं पिवळी पडतात**

नखांवर नेलपॉलिश जास्त दिवस राहील्यास नखांची नैसर्गिक चमक कमी होते. नखं पिवळी पडतात.

**कोरडेपणा**

नखांवर नेलपॉलिश लावल्याने नखांना आवश्यक ऑक्सीजन मिळत नाही. तसेच नखांवर नेलपॉलिश जास्त दिवस ठेवल्याने नख कोरडी होतात व तुटतात.

**ॲलर्जी**

काही नेलपॉलिशमध्ये फॉर्मेल्डिहाइड , टोल्यून यांसारख्या हानिकारक रासायनिक तत्वांचा वापर करण्यात आलेला असतो. नखांवर जास्त दिवस नेलपॉलिश ठेवल्यास या रसायनांचा त्वचेवरही परिणाम होतो. त्यामुळे अनेकांना ॲलर्जी, खाज किंवा पुरळ सारख्या समस्यांचा त्रास होतो.

**फंगल इन्फेक्शन**

नखांवरील नेलपॉलिशचा मोठा थर नखांना कव्हर करतो. त्यामुळे नखांमध्ये ओलसरपणा तसाच राहतो. त्यामुळे फंगल इन्फेक्शनचा शक्यता वाढते.

**किती दिवसांनी नेलपॉलिश काढावी**

तज्ज्ञांनुसार नखांवर कोणतीही नेलपॉलिश ५ ते ७ दिवसांपेक्षा जास्त दिवस ठेवू नये. आठवड्याभरानंतर नखांवरून नेलपॉलिश काढावी. त्यामुळे नखांपर्यंत ऑक्सीजन पोहचण्यास मदत होते. त्यातील कोरडेपणा जातो. पण जर तुम्हाला नेलपॉलिश लावण्याची आवड असेल तर नेलपॉलिश अप्लाय आणि रिमूव्हल मध्ये २-३ दिवसांचे अंतर असावे.

**नेलपॉलिश कशी काढाल?**

नेलपॉलिश काढण्यासाठी एसीटोन, फ्री रिमूव्हर वापरावे.प्रत्येकवेळी नखं काढल्यावर नखांवर आणि क्युटिकल्सवर मॉयस्चरायझर किंवा तेल लावावे.नेलपॉलिश लावताना नखांवर सर्वात आधी बेस कोट लावावा.

त्यामुळे नेलपॉलिशमधील रासायनिक घटकांचा त्यांवर परिणाम होत नाही.



# सिंहस्थ कुंभमेळा : साधुग्राम अवश्य उभारा

## परंतु एकाही झाडाची हत्या होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घ्यावी

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा ३१ आक्टोंबर २०२६ ला सुरू होणार असून २४ जुलै २०२८ पर्यंत चालेल ही आनंदाची गोष्ट आहे.याचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे आणि व्हायलाच पाहिजे.परंतु कोणताही कार्यक्रम आखतांना पर्यावरणाला विशेष महत्त्व देणे अत्यंत गरजेचे आहे.कारण आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाचा ह्रास देवीदेवता किंवा पर्यावरणवादी सहन करणार नाही.सरकारने विकासाबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे.पर्यावरण वाचले तरच पुढची पिढी, निसर्ग,पशुपक्षी,औषधीयुक्त वनस्पती,जीवजंतू सुरक्षित राहील याची जाण सरकारने ठेवली पाहिजे.साधुग्रामसाठी सरकार वृक्ष तोडीबद्दल राजकारण होत असल्याचे माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस म्हणतात, परंतु यात तथ्य नाही. कारण जशे-जशे वृक्ष कटाई होत राहिल तशे-तशे सर्वांचेच आयुष्य कमी-कमी होत जाईल ही बाब मुख्यमंत्र्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. वृक्षतोड म्हणजेच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे आयुष्य दिवसेंदिवस कमीकमी होणे होय.त्यामुळे वृक्षतोडीला राजकीय उपमा देणे मुख्यमंत्र्यांना शोभत नाही.वृक्ष हे पृथ्वीचा,निसर्गाचा, पर्यटनाचा,मानव-पशुपक्षी-संपुर्ण जीवजंतू यांचा आत्मा आहे. आम्हीही सनातनवादी व हिंदू आहोत.परंतु जो निसर्ग प्राणवायू देतो आणि लाखोंचे प्राण वाचवितो अशा झाडांची कत्तल वर्षभराच्या कार्यक्रमासाठी तब्बल १८०० पेक्षा अधिक मोठमोठ्या झाडांची कटाई करने म्हणजे ही हत्या नाही तर काय? मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज येथे कुंभमेळ्यासाठी तब्बल १५ हजार हेक्टर जमीन उपलब्ध होती याचे स्वागतच ती जमीन बंजार असावी किंवा तिथे झाडे नसावेत.कारण उत्तरप्रदेश १५ हजार हेक्टर मधील झाडांच्या कटायीची कोणतीही घटना सामोरं आलेली नाही आणि आपण प्रयागराजची तुलना नाशिकशी का करावी?मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज कुंभमेळाव्याच्या तुलनेत नाशिक येथे साधुग्रामसाठी केवळ ३५० एकर जमीन आहे.माननीय मुख्यमंत्री महोदय ३५० एकर म्हणजे कमी जागा झाली काय?ही आपली व सरकारची जबाबदारी आहे की ३५० एकरमधील एकही वृक्ष कटायला नकोच. कारण नाशिक ही राज्यासह देशासाठी पावण भुमि आहे सोबतच देशाचे मोठे पर्यटन स्थळ सुध्दा आहे.देश-विदेशातील नागरिक व पर्यटक देवदर्शनासाठी अवश्य येतातच यात दुमत नाही.मुख्यत्वेकरून तपोवनाचा आनंद घेऊन स्वतःला धन्य मानतात.कारण तपोवनात भगवान राम,लक्ष्मण व सीता याची पावन भुमि असल्याने साक्षात भगवान राम यांचे साक्षात दर्शन झाल्याचा भास सर्वांनाच होतो.त्यामुळे सरकारने कोणतेही चुकीचे पाऊल न उचलता साधुग्रामसाठी योग्य ती जागा उपलब्ध करावी.कारण झाडे वाचली तरच पुढची पिढी सुरक्षित राहील अन्यथा झाडांसोबतच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंचा ह्यास झाल्याशिवाय रहाणार नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे तपोवनातील एकही झाड न तोडता साधुग्राम उभारत असेल तर त्याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल.मी सरकारला एक सुचणा देतो की वृक्ष तोडीच्या विरोधात सामाजिक संघटना, नाशिककर, राजकीय पक्ष, अभिनेता सामोरं येतं असेल तर याचे स्वागत सरकारने सुध्दा करावे कारण आपण पहिलेच प्रदुषणाने गुदमरत आहोत याची जाण सरकारने ठेवाली पाहिजे.झाड तोडणीसाठी मुजोरी करून चालणार नाही. आवश्यकता असेल तर झाडांच्या फांद्यांची



छाटणी अवश्य करावी.सरकाने तपोवनातील वृक्षतोडीचा प्रश्न सौहार्दपूर्ण पध्दतीने हाताळला पाहिजे आणि पर्यावरण, निसर्ग, पर्यटन,पर्यटक यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही याचीही खात्री केली पाहिजे. मंत्री नितेश राणे पर्यावरणाची तुलना ईदच्या बकरी कापण्याशी करून वादग्रस्त वक्तव्य करतात ही हास्यास्पद बाब आहे .राणे साहेब ईद हा वेगळा मुद्दा झाला यांच्याशी आणि पर्यावरणाशी काहीही संबंध नाही.अहो राणे साहेब १८०० झाडांची कत्तल म्हणजे १८ लाख लोकांचा,पशुपक्षांचा व जीवजंतूची श्वास कोंडून हत्याच ना! याचा आपण विचार का करीत नाही.आम्हाला राजकारण नकोच फक्त पर्यावरण सुरक्षित रहावे,पृथ्वीचे संतुलन सुरक्षित असावे, सर्वांना शुद्ध हवा मिळावी, पर्यटकांना तपोवनाचा आनंद मिळावा हाच आमचा पर्यावरणवाद्यांचा व जनतेचा खरा उद्देश आहे.नाशिक मनपा प्रशासनाच्या व सरकारच्या निर्णयाचा साधू-महंतांनी कडाडून विरोध करायला हवा.कारण साधू-महंतांचे वास्तव मुख्यत्वे करून हे वृक्षांच्या सानिध्यात असते आणि असायलाच पाहिजे.नाशिकच्या तपोवनाचा इतिहास रामायणाशी सुध्दा जुळला आहे.याच तपोवनात भगवान राम,सीता आणि लक्ष्मण यांनी त्यांच्या १४ वर्षाच्या वनवासातील बराचसा काळ याठिकाणी घालवीला होता. त्यामुळे हे पावण स्थळ राज्यासाठीच नाही तर देशासाठी व जगासाठी ऐतिहासिक स्थळ मानल्या जाते.त्याचप्रमाणे याच स्थळी लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले होते असेही सांगितले जाते.आपण रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी अयोध्येत भव्य राममंदिर उभारले ही देशासाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली बाब आहे.परंतु ज्या तपोवनात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांचा सहवास होता आणि लक्ष्मणाने ज्या ठिकाणी शूर्पणखेचे नाक कापले अशा ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तव्याला जर सरकार १८०० वृक्ष कापून काडीमोड करून नेस्तनाबूत करीत असेल तर ही कसली रामराज्याची कल्पना म्हणावी! तपोवनातील एक जरी वृक्ष कटत असेल तर हा मानवजाती वर,पशूपक्षांवर,निसर्गावर,पौराणिक कथांवर व देशातील जनतेच्या भावनांवर मोठा प्रहार समजल्या जाईल. आपण जेव्हा रामराज्याची कल्पना करतो तेव्हा सर्वच बाजूंचा विचार सरकारने केला पाहिजे.प्रश्न रहाला साधू महंतांच्या वास्तव्याचा यासाठी अनेक पर्यायी व्यवस्था सरकार जवळ आहेत.पटांगत, ग्राउंड,शासकीय कॉटेजेस,धर्मशाळा, राजकीय पुढाऱ्यांचे फॉर्म हाऊस व त्यांची शेत जमीन असे अनेक पर्याय आहेत.परंतु साधू महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील १८०० पेक्षा जास्त वृक्षांची हत्या करून साधूग्राम तयार करने म्हणजे निसर्गाची खुली हत्याच!आज आपण पहात आहोत की, देशासह जगात बदलत्या हवामानामुळे महाप्रलय, सुनामी, भुकंप,अती पाऊस,अती उष्णता यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे आणि हा संपूर्ण प्रकार जंगल कटाई व वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सर्वांच्या डोळयासमोर आहे तरीही नाशिकमधील ऐतिहासिक तपोवनातील वृक्षांची कत्तल करण्यासाठी सरकार हिरवी झेंडी देत ही अत्यंत दुर्भाग्य पुर्ण बाब आहे. ही अशी गोष्ट झाली की "आ बैल मुझे मार". सरकार सांगते की झाडे लावा,झाडे जगवा आणि स्वतः तब्बल १८०० झाडांची कत्तल करायची हा कुठला न्याय म्हणावा!आज एक वृक्ष लावले तर त्याला मोठे व्हायला ५ ते १० वर्षे लागतात आणि नाशिक मनपा प्रशासन व सरकार एकाच वेळेस १८०० वृक्ष कापण्याचा आदेश देत आहे ही फक्त नाशिकलाच नाही तर देशाला घातक सिद्ध होवू शकते.आज देशातील व राज्यातील वृक्षतोडीमुळे प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे. जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे आणि आता नागपूर सुध्दा प्रदुषणाच्या छायेत आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे. वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झालाआहे.तपोवनातील एकही वृक्ष कटणार नाही याची जबाबदारी सर्वप्रथम मनपा प्रशासनने व सरकारने घेतली पाहिजे. नाशिककर, निसर्गप्रेमी,समाजसेवी संघटना, अनेक राजकीय पक्ष तपोवनातील वृक्ष तोडीच्या विरोधात उभे ठाकले आहे आणि आता या आंदोलनाला मोठे बळ वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यामुळे मिळाले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. सरकारने वृक्ष लावणे शिकावे व वृक्ष तोडणे टाळावे. आज राज्यातील प्रत्येक शहरापासून ३० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण झालेले आहे.यामुळे लाखोंच्या संख्येने झाडांची खुलेआम कत्तल सरकारने केली आणि याचे प्रायश्चित्त राज्याच्या जनतेला प्रदुषणाच्या माध्यमातून भोगावे लागत आहेत. त्याचप्रमाणे अनेक हिंसक पशु शहराकडे धाव घेत आहेत हा सर्व प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे. झाडांच्या कत्तलमूळे दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी-कमी होत आहे याचे भान सरकारने ठेवले पाहिजे. नाशिक मनपा प्रशासन व सरकार आपण जर चुकीचे पाऊल उचलले तर याचे गंभीर परिणाम राज्याला भोगावे लागतील. सरकारने नाशिककरांच्या भावनांचा,पौराणिक कथांचे वास्तव,निसर्गाची ढासळती परिस्थिती,बदलते हवामान, पर्यटक,पर्यटन या संपूर्ण बाबींचा गांभीर्याने विचार करावा आणि तपोवनातील झाडांच्या कत्तलीचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा अन्यथा याचे गंभीर परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागतील.झाडे वाचली तरच पुढची संपूर्ण पिढी सुरक्षित राहील.जय हिंद.

- रमेश कृष्णराव लांजेवार

# गोकर्णाच्या फुलापासून घरीच बनवा नैसर्गिक विंटर क्रीम

प्रत्येक स्त्रीला आपला चेहरा तेजस्वी दिसावा असं वाटत असतं. त्यातच हिवाळयात चेहऱ्याची निगा राखणं कठीण जातं. या दिवसांत त्वचेच्या समस्या वाढतात, ज्यामुळं चेहरा कोरडा, निस्तेज दिसतो. बाजारातील काही उत्पादने वापरूनही कधीकधी परिणाम दिसत नाही. अशावेळी तुम्ही आरोग्यासाठी गुणकारी असलेलं गोकर्णाचं फुल वापरून एक विंटर क्रीम तयार करू शकता. हे क्रीम लावल्यानंतर तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार दिसेल.

गोकर्णाच्या फुलापासूनचं क्रीम तयार करण्यासाठी अगदी मोजकं साहित्य लागतं. यासाठी काही गोकर्णाची फुलं, गरम पाणी, कॉर्न फ्लोअर, बदाम तेल, कोरफडचं जेल, व्हिटॅमिन ई कॅप्सूल लागतं. गोकर्णाची फुले स्वच्छ धुवा आणि पाण्यात १० मिनिटे उकळून घ्या. यामुळं त्याचा निळा रंग पाण्यात उतरतो. यानंतर एका भांड्यात कॉर्न फ्लोअर घ्या आणि त्यात फुलांचे पाणी



मिसळा. नंतर त्यात कोरफडीचे जेल, व्हिटॅमिन ई कॅप्सूल आणि बदाम तेल मिसळा. यानंतर हे क्रीम हवाबंद डब्ब्यात ठेवा.

हे क्रीम दररोज रात्री तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि ५ मिनिटे मसाज करा. रात्रभर तसेच राहू द्या आणि सकाळी चेहरा धुवा. चेहऱ्यावर हे क्रीम लावल्याने कोरडेपणा कमी होतो. त्वचा मऊ आणि चमकदार दिसते. मात्र ते लावण्यापूर्वी पॅच टेस्ट करणे किंवा तज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.

# न्यू इयर ट्रिप प्लॅन करताय ?; 'ही' ठिकाणं ठरतात परफेक्ट; जल्लोषात होईल नव्या वर्षाचं स्वागत

बहुतांश जण आता न्यू इयरचं स्वागत करण्यासाठी काही खास योजना बनवत असतील. अशातच जर तुम्ही न्यू इयर ट्रिप प्लॅन करत असाल तर देशातील काही ठिकाणं त्यासाठी परफेक्ट ठरतात. या ठिकाणी तुम्ही अगदी जल्लोषात, प्रवासाचा आनंद घेत नव्या वर्षाचं स्वागत करू शकता. चला तर मग त्या ठिकाणांबद्दल जाणून घेऊया..

ही अशी काही ठिकाणं आहेत जिथे तुमच्या नव्या वर्षाची सुरूवात खरोखरच खास आणि अविस्मरणीय होईल. अगदी हिमालयाच्या बर्फाळ दऱ्यांपासून ते समुद्राच्या किनाऱ्यांपर्यंत ही ठिकाणे तुम्हाला एक अद्भुत अनुभव देतील.

**मनाली**

हिमाचलच्या थंड वातावरणात आणि बर्फाच्छादित दऱ्यांमध्ये मनालीत नवीन वर्षाची सुरूवात करता येईल. कॅफे कल्चर,



बोनफायर आणि लाईव्ह संगीतासह, तुम्हाला एक अनोखा अनुभव मिळेल. तसेच तुम्ही साहसी असाल तर इथे अनेक ॲडव्हेंचर्स ॲक्टिव्हिटीचा आनंद तुम्ही घेऊ शकता.

**गोवा**

जर तुम्ही पार्टी लव्हार असाल, तर गोवा तुमच्यासाठी योग्य ठिकाण आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला येथील समुद्रकिनारे, क्लब आणि कॉटेजेसमध्ये तुम्ही एन्जॉय करू शकता. तसेच लाईव्ह डीजे, आतषबाजी यामुळं नवीन वर्षाची सुरूवात करण्यासाठी गोव्याला सर्वाधिक पसंती असते.

**उदयपूर**

राजस्थानमध्ये प्रत्येक उत्सव खास बनतो. उदयपूरचे तलाव, राजवाडे आणि भव्य हॉटेल्स नवीन वर्षाला एक शाही अनुभव देतात. हे ठिकाण जोडप्यांसाठी आणि कुटुंब सहलींसाठी सर्वोत्तम ठरतं.

**ऋषिकेश**

जर तुम्हाला पार्टीपेक्षा शांतता आवडत असेल तर ऋषिकेश तुमच्यासाठी परफेक्ट ठिकाण आहे. गंगेच्या काठ, आरतीचे अध्यात्मिक वातावरण तुम्हाला नवीन वर्षाची सुरूवात करण्यासाठी सकारात्मक अनुभव मिळतो.

**शिलाँग**

ईशान्य भारतातील हे सुंदर शहर संगीत आणि निसर्ग प्रेमींसाठी स्वर्गापेक्षा कमी नाही. शिलाँगचे लोकल म्युझिक बँड, थंड वातावरण आणि निसर्गरम्य दृश्यांमुळं न्यू इयर सेलिब्रेशन आणखी खास बनतं.

# मेथीचे मुटके




**साहित्य :** बारीक चिरलेली मेथी - एक जुडी, ज्वारीचे पीठ - १ वाटी, बेसन - अर्धी वाटी, तिखट - अर्धा चमचा, हळद - अर्धा चमचा, आलं-लसूण पेस्ट - अर्धा चमचा, हिंग - पाव चमचा, तीळ - १ चमचा, धणे- जिरे पावडर - अर्धा चमचा, मीठ, तेल, पाणी.

**कृती :** मेथी एक चमचा तेलात थोडी परतून घ्या.परतलेली मेथी एका बाऊलमध्ये घेऊन त्यात ज्वारीचे पीठ आणि बेसन घाला. यामध्ये हिंग, हळद, तिखट, धणे-जिरे पावडर, तीळ, मीठ, आलं-लसूण पेस्ट घालून पाणी घालून पीठ मळा. १० मिनिटे मुरण्यासाठी झाकून ठेवा.मळलेल्या पिठाचे हातानेच मुटके तयार करा.गॅसवर एका पातेल्यात पाणी उकळत ठेवा आणि त्यावर चाळणी ठेवून हे मुटके १० ते १५ मिनिटे वाफवून घ्या.वाफवल्यावर मुटके थंड करून गरम तेलात तळून घ्या.हे गरमागरम मुटके दही, सॉस, हिरवी चटणीसोबत सर्व्ह करा.

दैनिक लोकरक्षणाय
सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी


माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख


भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता


पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी


सामन्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा


महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती
ध्यास+
समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ
ध्यास सकारात्मकतेचा

# हेमंत ढोमेची क्षिती जोगसाठी खास पोस्ट; म्हणाला...

हेमंत ढोमे काही दिवसांपासून त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याने दिग्दर्शित केलेला 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता मात्र हेमंत त्याच्या चित्रपटामुळे नाही, तर त्याने शेअर केलेल्या पोस्टमुळे चर्चेत आहे. हेमंतने सोशल मीडियावर क्षिती जोगसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. त्याने इन्स्टाग्रामवर क्षितीबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. फोटो शेअर करीत त्याने लिहिले, "पाटलीणबाई तुमच्याबरोबर राहून दाढी पांढरी झाली. तुमच्यामुळे असं आज म्हणणार नाही. पण, तुमच्याबरोबर म्हातारं होण्यात लई मजा आहे. असेच राहूया."

पुढे त्याने लिहिले, "एकमेकांबरोबर जगूया. बाकी तुला तर माहीतच आहे. खूप खूप प्रेम आणि लग्नाच्या तेराव्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. लव्ह यू." लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हेमंतने ही पोस्ट शेअर केली आहे.





त्यांच्या लग्नाला १३ वर्षे पूर्ण झाली आहेत. २०१२ ला लग्नगाठ बांधली होती. हेमंतने शेअर केलेल्या पोस्टवर अनेकांनी कमेंट्स करीत त्यांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. एकाने लिहिले, "हॅपी ॲनिव्हर्सरी गोड माणसं", दुसऱ्याने लिहिले, "हॅपी ॲनिव्हर्सरी, तुम्ही दोघे माझ्यासारख्या युवा पिढीसाठी एक खूप मोठे प्रेरणास्थान आहात. तुमचा आनंद असाच कायम राहो", आणखी एकाने लिहिले, "तुम्ही दोघेही आमचे आवडते आहात." आणखी कमेंट्सही लक्ष वेधून घेत आहेत. चाहत्याने हेमंत व क्षितीला शुभेच्छा देत लिहिले, "क्षिती-हेमंत जोडी आहे फर्स्टक्लास, सनी सनी सूर्यप्रकाश घेऊन येवो तुमच्या सुखी संसारात भरभराट, समृद्धी अन् समाधानकारक झिम्मा खेळत राहो तुमच्या अंगणी, प्रेमापासून लग्नापर्यंतचा तुमचा चलच्चित्र प्रवास आयुष्यभर आनंददायी अनुभव तुम्हास देत राहो. आता सर्वत्र थोडी क्रांती घडावी अन् मराठी विद्यालयात शिकल्यामुळे देते तुम्हास लग्नाच्या वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा! तुम्हा दोघांना लाभो निरोगी आयुष्य हीच ईश्वरचरणी प्रार्थना करते." त्यामध्ये हेमंत व क्षितीच्या चित्रपटांचा उल्लेख केल्याचे दिसत आहे. तर हेमंतचा जवळचा मित्र अमेय वाघनेदेखील कमेंट करीत लक्ष वेधले आहे. त्याने लिहिले, "गोरेगाव अन्नछत्र योजनेचे अध्यक्ष व खजिनदार ह्यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त काळा रस्सा शुभेच्छा."

सायली संजीव व वैदेही परशुरामी यांच्यासह इतर कलाकारांनीदेखील शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यमविषयी बोलायचे झाले तर हेमंतने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात क्षितीसह सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, प्राजक्ता कोळी हे आणि इतर कलाकार दिसणार आहेत. हा चित्रपट १ जानेवारी २०२६ ला प्रदर्शित होणार आहे.

# गौरव खन्ना ने जिंकली 'बिग बॉस १९ची' ट्रॉफी, मिळाले 'इतके' पैसे

लोकप्रिय हिंदी रिॲलिटी शो बिग बॉस १९चा भव्य अंतिम सोहळा नुकताच पार पडला आणि या सीझनची ट्रॉफी अभिनेता गौरव खन्ना याने जिंकत आपल्या शांत पण दमदार खेळाची मुहर उमटवली. जवळपास तीन महिन्यांच्या प्रवासानंतर गौरवने विजेतेपद पटकावत प्रेक्षकांची मने जिंकली. त्याची जवळची प्रतिस्पर्धी फरहाना भट्ट उपविजेती ठरली.




**तीन महिन्यांचा रोलर कोस्टर**

२४ ऑगस्टला १८ स्पर्धकांच्या प्रवेशाने या सीझनला सुरुवात झाली होती. नेहमीप्रमाणे घरातील तणाव, मजा, वाद, भावना, मैत्री आणि स्पर्धा यामुळे हा सीझन प्रेक्षकांसाठी सतत चर्चेत राहिला. प्रत्येक आठवड्यात नवीन टास्क, नवीन नाती आणि अनपेक्षित ट्विस्ट पाहायला मिळाले.

**गौरव खन्नाचा शांत आणि स्मार्ट खेळ**

सुरुवातीपासूनच कमी बोलणारा, स्वतःपुरता राहणारा आणि शांत स्वभावाचा स्पर्धक म्हणून गौरव खन्ना ओळखला गेला. मात्र, टास्कदरम्यान त्याने दाखवलेले धैर्य, स्थिर विचार आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता यामुळे तो हळूहळू मजबूत दावेदार ठरला. त्याच्या संयमी खेळीनेच त्याला अंतिम फेरीत सर्वांची मने जिंकत विजेतेपद मिळवून दिले.

उपविजेती झालेली फरहाना भट्टही या सीझनमधील महत्त्वाची स्पर्धक ठरली. तिची परफॉर्मन्स आणि व्यक्तिमत्त्वामुळे ती प्रेक्षकांची आवडती बनली होती. जरी ती कमी फरकाने हरली, तरी तिच्या खेळाची छाप कायम राहिली.

**अंतिम फेरीचे रोमांचक निकाल**

अंतिम फेरीत स्पर्धकांची एलिमिनेशन प्रक्रिया टप्प्याटप्प्याने झाली. सर्वप्रथम गायक अमाल मलिक बाहेर झाला. त्यानंतर तान्या मित्तल आणि मग प्रणित मोरे घराबाहेर झाले. अखेर गौरव खन्नाने ट्रॉफी हातात उचलत बिग बॉस १९ वर आपला ठसा उमटवला. विजेता म्हणून त्याला ५० लाख रुपयांचे रोख बक्षीस आणि आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

# "तो जिंकला नाही याची खंत"; प्रणित मोरेच्या आई-वडिलांची प्रतिक्रिया, मुलाचं कौतुक करत म्हणाले..

'बिग बॉस १९'चा नुकताच ग्रँड फिनाले पार पडला आणि हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेता गौरव खन्ना 'बिग बॉस' हिंदीच्या १९व्या पर्वाचा विजेता ठरला. गौरव खन्ना, फरहाना भट्ट आणि प्रणित मोरे हे तीन सदस्य टॉप तीनपर्यंत पोहोचले होते, पण प्रणितचं इविक्शन झाल्यानंतर तो 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडला. प्रणितने जरी 'बिग बॉस'ची ट्रॉफी पटकावली नसली तरी त्याने अनेकांची मनं जिंकली आहेत. अशातच त्याच्या आईनेही प्रणितबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

प्रणित मोरे 'बिग बॉस १९'च्या घरातील एकमेव मराठी चेहरा होता. त्याने संपूर्ण सीझन प्रेक्षकांचं त्याच्या विनोदीशैलीने मनोरंजन केलं. प्रत्येक टास्कमध्ये त्याने त्याच्या परीने १०० टक्के देण्याचा प्रयत्न केला, त्यामुळेच त्याला संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. अनेकांनी त्याला वोट केलं, त्यामुळेच तो जरी ट्रॉफी जिंकला नसला तरी त्याने अनेकांची मनं जिंकली अशा पोस्ट आणि रील सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.

प्रणित घराबाहेर पडल्यानंतर त्याने माध्यमांशी संवाद साधला. त्याचबरोबर त्याच्या कुटुंबीयांनाही त्याच्याबद्दल विचारण्यात आलं. त्याच्या भावानेही त्याचं कौतुक केलं. अशातच आता प्रणितच्या आईनेही त्याचं कौतुक केलं आहे. यावेळी त्यांनी प्रणितमुळे त्यांना लोक ओळखत आहेत असं म्हटलं आहे. 'टेली मसाला'शी संवाद साधताना प्रणितच्या आई म्हणाल्या, "आम्ही खूप खूप आनंदी आहोत. म्हणजे आता लोक आम्हाला त्याच्या नावाने ओळखत आहेत. प्रणितची आई, प्रणितचे बाबा जेव्हा आम्ही बाहेर जातो तेव्हा सगळे विचारतात, तुम्ही प्रणितच्या आई आहात ना? हे ऐकून खूप छान वाटतं." प्रणितच्या आईला पुढे प्रणित शोमध्ये अनेकदा



भावुक झाला तेव्हा तुमच्या काय प्रतिक्रिया असायच्या असं विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, "आम्हीसुद्धा तेव्हा खूप भावुक झालेलो. मी आयुष्यात कधी इतकी रडली नाहीये, जितकी मी तीन साडे तीन महिन्यात त्याला रडताना पाहिल्यानंतर रडले आहे." पुढे त्यांना प्रणित जिंकला नाहीये याबद्दल विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, "आम्हाला खंत वाटत नाही. गौरव जिंकला त्याचाही आम्हाला आनंद आहे. प्रणित तिसऱ्या क्रमांकावर बाहेर पडला याचा आम्हाला आनंदच आहे आणि आमच्यासाठी तो विजेताच आहे. तो जिंकला असता तर आनंदच झाला असता, पण त्याला मिळणारं प्रेम पाहून आम्हाला त्याचा खूप आनंद आहे; आमच्यासाठी तोच विजेता आहे." प्रणित मोरेच्या आईला परिसरातील शेजारच्या लोकांच्या काय प्रतिक्रिया आहेत असं विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, "सगळे खूप आनंदी आहेत आणि त्याची वाट पाहत आहेत. प्रणितला पाठिंबा दिल्याबद्दल सगळ्यांचे आभार." प्रणित मोरेच्या वडिलांनीसुद्धा यावेळी त्याचं कौतुक केलं आहे.

प्रणित मोरेचे वडील म्हणाले, "तो जिंकला नाही याची खंत नाही, त्याची 'बिग बॉस मराठी'साठी निवड होईल असं आम्हाला वाटलेलं, पण हिंदीसाठी झाली; चांगली गोष्ट आहे, त्याने सलमान खानबरोबर काम केलं ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे."

# रणवीर सिंगच्या "धुरंधर" चित्रपटाने नवीन वाद निर्माण केला, बलुचिस्तानने चुकीचे चित्रण केल्याचा आरोप केला

मीर यार बलोचने "धुरंधर" चित्रपटातील बलोच समुदायाच्या संवादांवर आणि चुकीच्या चित्रणावर तीव्र आक्षेप घेतला आणि त्याला त्यांच्या संस्कृतीचा आणि संघर्षाचा अपमान म्हटले.

णवीर सिंगचा नवीन प्रदर्शित झालेला "धुरंधर" चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगला कामगिरी करत आहे, परंतु त्याच्या कथेतील काही भागांमुळे एक नवीन वाद निर्माण झाला आहे. चित्रपटात पाकिस्तानचे आणि विशेषतः बलुचिस्तानचे चित्रण करण्याच्या पद्धतीवर बलोच समुदाय खूप नाराज आहे.

बलोच कार्यकर्ते मीर यार बलोच यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर आपला आक्षेप नोंदवला आणि लिहिले की चित्रपटात बलोचचे असे चित्रण केले आहे की जणू ते भारतविरोधी कारवाया किंवा दहशतवादी घटनांमध्ये सहभागी आहे. ते म्हणतात की बलोच समुदायाने कधीही २६/११ सारख्या कोणत्याही दहशतवादी कृत्याला पाठिंबा दिला नाही, उलट ते वर्षानुवर्षे पाकिस्तानने प्रायोजित केलेल्या दडपशाही, हिंसाचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनांना तोंड देत आहे. "बलुचांचे चुकीचे चित्रण करण्यात आले आहे"

मीर यार म्हणतात की चित्रपटात दाखवलेली दृश्ये बलुच ओळख आणि समाजाचे वास्तव प्रतिबिंबित करत नाहीत आणि त्यामुळे गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. सर्वात वादग्रस्त भाग



म्हणजे संवाद, जो म्हणतो, "मगरमच्छावर विश्वास ठेवता येतो, पण बलुचवर नाही." हा संवाद बलुच समुदायाच्या प्रतिष्ठेवर थेट हल्ला मानला जात आहे. मीर यार यांच्या मते, निष्ठा, सन्मान आणि वचनबद्धता त्यांच्या समाजात खूप आदराने पाहिली जाते. म्हणून, त्यांना अविश्वासू म्हणून चित्रित करणे पूर्णपणे अन्याय्य आहे. बलुच कार्यकर्त्यांनी चित्रपट निर्मात्यांवर गंभीर आरोप केले, आरोप केला की त्यांनी बलुच इतिहास, भू-राजकीय परिस्थिती आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर कोणतेही सखोल संशोधन केले नाही. त्यांचा असा युक्तिवाद आहे की बलुच चळवळ, त्यांची सामाजिक रचना आणि संघर्ष वरवरच्या पद्धतीने चित्रित केले गेले आहे. ते म्हणाले की जर बलुच खरोखरच इतके साधनसंपन्न आणि चित्रपटात दाखवल्याप्रमाणे गुन्हेगारी नेटवर्कशी जोडलेले असते, तर आज बलुचिस्तान गरिबी, अत्याचार आणि संघर्षात का अडकले असते?

दरम्यान, या मुद्द्याबाबत सोशल मीडियावर चर्चा तीव्र झाली आहे. अनेकांचा असा विश्वास आहे की जेव्हा एखादा चित्रपट संवेदनशील राजकीय किंवा वांशिक मुद्द्यांवर आधारित असतो तेव्हा जबाबदारी आणि संशोधन आवश्यक असते. वाद वाढत असतानाही, "धुरंधर" चा प्रेक्षकांवरील प्रभाव कमी झालेला नाही आणि चित्रपट व्यावसायिकदृष्ट्या चांगली कामगिरी करत आहे.

# केळीच्या पानावर जेवण केल्यास काय होते?; फायदे जाणून स्टीलच्या ताटात खाणं सोडाल

आजकाल घरात स्टील, प्लास्टिक किंवा सिरॅमिकच्या ताटात जेवण वाढलं जातं. पण फार पूर्वीपासून आपल्याकडे केळीच्या पानात जेवणाची प्रथा आहे. आजकाल केळीच्या पानात जेवण करणं दुर्मिळ बनलं आहे. पण आजही दक्षिण भारतात, केळीच्या पानांवर जेवण वाढलं जातं. तसेच काही रेस्टॉरंट्समध्येही केळीच्या पानात डिश सर्व्ह करतात. केळीच्या पानात जेवण्याचे आरोग्याला अनेक फायदे असतात. तुम्ही ते फायदे जाणून घेतले तर स्टील आणि प्लास्टिकच्या ताटात जेवणं सोडाल..

**पौष्टिक मूल्य**

केळीच्या पानांमध्ये पॉलीफेनॉल आणि जीवनसत्त्वे अ आणि क सारखे अनेक आवश्यक पोषक घटक असतात. त्यामुळं त्यावर गरम अन्न वाढलं की हे घटक अन्नात मिसळतात त्यामुळं आरोग्याला फायदा होतो.

**पचनक्रिया सुधारते**



केळीच्या पानांवर जेवल्याने पचनक्रिया सुधारते. कारण त्यात नैसर्गिक एंजाइम आणि फायबर असतात. हे अपचन, बद्धकोष्ठता आणि गॅस सारख्या समस्या कमी करण्यास फायदेशीर असतं.

**बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म**

केळीच्या पानांमध्ये असे गुणधर्म असतात जे बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखतात. म्हणून, त्यावर जेवल्याने अन्नजन्य आजाराचा धोका कमी होतो. पानांच्या पृष्ठभागावर असलेले घटक बॅक्टेरिया वाढीस रोखतात, ज्यामुळे अन्न सुरक्षित राहते.

**रोगप्रतिकारकशक्ती**

केळीच्या पानांमधील अँटीऑक्सिडंट्स आणि पॉलीफेनॉल शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. हे घटक शरीराचे संसर्गापासून संरक्षण करतात. केळीच्या पानांचे बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असल्याने अन्नातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट होतात.

**रसायनमुक्त**

प्लास्टिक किंवा स्टीलच्या भांड्यांच्या तुलनेत केळीची पाने पूर्णपणे नैसर्गिक असतात आणि त्यात कोणतेही हानिकारक रसायने नसतात. केळीच्या पानांवर जेवण केल्याने प्लास्टिकमध्ये आढळणाऱ्या बीपीएसारख्या हानिकारक रसायनांचा धोका कमी होतो.




**मेष** – ठरवलेली कामे कामे पार पाडाल. योग्य अनुमान काढाल. तारतम्याने वागा. सामाजिक बांधिलकी जपाल. प्रेमाला चालना मिळेल.

**वृषभ** – मित्र मदत करतील. खाण्याची काळजी घ्या. नोकरीत टिकून राहता येईल. इतरांच्या वागण्याचा फार विचार करू नका.

**मिथुन** – अनुभवी व्यक्तींचे सहकार्य मिळेल. नातेवाईकांची ये-जा वाढेल. विरोध मोडून काढता येईल. नव्या कामास आरंभ करा.

**कर्क** – भागीदारीतील कार्यात पुढाकार घ्याल. कौटुंबिक समस्या सोडवाल. वाटाघाटीत तणाव होईल. नोकरी टिकवा. वेळेला महत्त्व द्या.

**सिंह** – जोडीदाराचा वरचष्मा राहील. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. सहकाऱ्यांची नाराजी पत्करू नका. चारचौघांत कौतुक होईल.

**कन्या** – एकलकोंडेपणा दूर होईल. सर्वांशी सौजन्याने वागा. धार्मिक कामात पुढाकार घ्याल. परोपकाराचे महत्त्व पटवून द्याल.

**तूळ** – धंद्यात मोठा फायदा होईल. घरातील कामे होतील. आनंदी राहाल. आर्थिक व्यवहारात सतर्क राहा. शैक्षणिक कामे होतील.

**वृश्चिक** – आपल्या आत्मविश्वासात भर पडेल. धंद्यात वाद तसेच अरेरावी करू नका. सामाजिक कार्याला हातभार लावाल.

**धनु** – मनाप्रमाणे घटना घडतील. वाटाघाटीचा प्रश्न मार्गी लावाल. चौकसपणे विचार करावा. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका.

**मकर** – वरिष्ठांकडून कौतुक केले जाईल. स्वतःच्या मर्जीने वागाल. कुणालाही कमी समजू नका. वृद्ध व्यक्तीची चिंता वाटेल.

**कुंभ** – कार्यपद्धतीचे कौतुक केले जाईल. भावंडांचे सहकार्य मिळेल. वरिष्ठांशी मिळते जुळते धोरण स्वीकारावे. धंद्यात वाढ होईल.

**मीन** – कौटुंबिक आनंद वाढेल. गैरसमजापासून दूर राहा. धार्मिक गोष्टींची आवड दर्शवाल. आपली साहित्याची आवड जोपासाल.

# कोकण हापूसवर गुजरातचा दावा; मानांकनावरून पेटला नवा वाद...; बागायतदार-विक्रेत्यांचा कायदेशीर लढ्याचा इशारा!

**सिंधुदुर्ग (दिगंबर जाधव) :** जगप्रसिद्ध, आंब्यांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोकण हापूस आंब्यावर गुजरातने थेट दावा केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. गुजरातने 'वलसाड हापूस' या नावाने भौगोलिक मानांकन (जीआय टॅग) मिळवण्यासाठी अर्ज केल्याने कोकणातील आंबा बागायतदार, शेतकरी व विक्रेते प्रचंड संतप्त झाले आहेत.

महत्त्वाचे म्हणजे २०१८ साली 'कोकण हापूस'ला कायदेशीर भौगोलिक मानांकन मिळालेले आहे. हे मानांकन मिळवण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांनी जवळपास १० ते १२ वर्षे लढा दिला होता. अशा परिस्थितीत आता इतर कोणाकडून 'हापूस' या नावाचा वापर करणे हे नियमबाह्य आणि बेकायदेशीर असल्याचा ठाम दावा कोकण हापूस उत्पादक व विक्रेता संघाने केला आहे. गुजरातच्या या दाव्यामुळे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा उत्पादकांची चिंता वाढली असून, मानांकन अबाधित ठेवण्यासाठी वेळप्रसंगी कायदेशीर लढा उभारण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. कोकण हापूस उत्पादक व विक्रेता संघाचे अध्यक्ष डॉ. विवेक भिडे, तसेच एम. के. गावडे, जयप्रकाश चमणकर यांनी सर्व बागायतदार, विक्रेते आणि शेतकऱ्यांना एकत्र येऊन लढा देण्याचे आवाहन केले आहे.

कोकणातील हापूस आंब्याची चव, सुगंध आणि गुणवत्ता यांमुळेच त्याला अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अरब देश व युरोपमध्ये मोठी मागणी आहे. दर हंगामात हापूस आंब्याच्या खरेदी-विक्रीत कोकण हापूसचाच बोलबाला असतो. कोकण हापूस हे हापूस आंब्याला मिळालेले पहिले आणि एकमेव जीआय मानांकन आहे, असे संघटनेने स्पष्ट केले. एकीकडे गुजरातचा जीआय टॅगसाठीचा प्रयत्न, तर दुसरीकडे कोकणातील



शेतकऱ्यांचा हक्कासाठी आक्रमक पवित्रामुळे 'कोकण हापूस'चा मानांकन वाद आता कायदेशीर आणि राजकीय पातळीवर जाण्याची दाट शक्यता आहे. आंब्याच्या राजासाठी आता कोकणात नवा निर्णायक लढा उभा राहात आहे.

**क्यूआर कोड लावूनही भेसळ वाढली**

कोकण हापूसला जीआय टॅग मिळाल्यानंतर २०२२ मध्ये नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राने 'शिवनेरी हापूस' नावाने मानांकनासाठी अर्ज केला. २०२३ मध्ये गांधीनगर व अस्सल कोकणी हापूससाठी क्यूआर कोड प्रणाली लागू करण्यात आली. मात्र तरीही बाजारात मोठ्या प्रमाणावर भेसळ सुरूच असल्याचे समोर आले आहे. आता नवसारी व गांधीनगर कृषी विद्यापीठाने 'वलसाड हापूस' जीआय टॅगसाठी अर्ज केल्याने हा वाद अधिकच चिघळण्याची शक्यता आहे. हे मानांकन मिळाल्यास कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> २०१५-१६ मध्ये मलावी देशात कोकणातील हापूस कलमांची लागवड होऊन 'मलावी हापूस' नावाने विक्री सुरू झाली होती. मात्र २०१८ मध्ये जीआय टॅग मिळाल्यानंतर २०१९ पासून नाव बदलून 'Malawi Mangoes' करण्यात आले.त्याच धर्तीवर कोकण हापूसचे मानांकनही अबाधित ठेवले गेले पाहिजे.
>
> डॉ. विवेक भिडे,
> अध्यक्ष कोकण हापूस उत्पादक व विक्रेता संघ

> गुजरातचा वलसाड हापूस असो किंवा कर्नाटकहून काहीही असो, रत्नागिरी व देवगड हापूसला कोणीही बाजूला करू शकत नाही. आमच्या हापूसची चव, दर्जा आणि ओळख कायम राहील, असे सांगत त्यांनी 'गुजराती आक्रमण' या आरोपांना दुजोरा दिला नाही.
>
> उदय सामंत, उद्योग मंत्री

SPORTS

# Junior Hockey World Cup 2025: India Lose 1-5 To Seven-Time Champions Germany; Will Face Argentina For Bronze

**Chennai :** The Indian Junior Men's Hockey Team faced a 1-5 loss against defending champions Germany in the Semifinal of the FIH Hockey Men's Junior World Cup Tamil Nadu 2025 in Chennai. Anmol Ekka (51') scored for India, while Lukas Kossel (14', 30'), Titus Wex (१५'), Jonas von Gersum (40') and Ben Hasbach (49') were the goal scorers for Germany.



Germany started the first quarter strongly, as they were aggressive in their press, forcing India to play in their own half. India initially did well to sustain the pressure and build from the back. However, they couldn't create a clear opportunity on goal. In the third minute itself, Germany were through on goal as Justus Warweg made a strong interception in a dangerous area. However, Indian goalkeeper Princedeep Singh did well to step out and make an incredible save early on.

In the 14th minute, Germany won the first Penalty Corner as Quirin Nahr took a shot which was stopped by Ankit Pal's body right in front of the goal, and the visitors were awarded a Penalty Stroke. The stroke was successfully converted by Lukas Kossel (14') as Germany gained a crucial lead. Just a minute later, India conceded another unfortunate goal as Titus Wex's (१५') pass inside the circle, met an unlucky deflection off of Sunil Palakshappa Bennur's foot as the ball rolled into the goal to end the first quarter.

India did well to regroup and improve their overall gameplay in the second quarter. They held more possession of the ball, controlled the midfield a lot better and made some crucial circle entries however, they couldn't test the German goalkeeper. Right before half-time, Germany won their second Penalty Corner of the evening, which was successfully converted by Lukas Kossel (30') again as he slotted the ball into the bottom left corner to further add to Germany's advantage.

India's first good attempt on goal came in the 34th minute as Ajeet Yadav did well to beat two German defenders with his skill and took a powerful shot towards goal, but goalkeeper Jasper Ditzer made a strong save to deny India a goal. Two minutes later, Germany won another Penalty Corner, but this time, Captain Paul Glander's flick went off-target. In the 40th minute, Indian attacker Arshdeep Singh made a strong dribble on the left flank and made his way along the baseline with his 3D skills, but couldn't get past the charging German goalkeeper. Seconds later, Jannik Enaux dribbled down the middle and passed it ahead to Alec von Schwerin through the Indian defence as he chipped the ball past the Indian goalkeeper towards goal, and Jonas von Gersum (40') tapped it into the open net to claim Germany's fourth goal.Four minutes into the fourth quarter, Germany played a long aerial pass over the Indian defence to Ben Hasbach (49') as he dribbled around Princedeep Singh and scored. Moments later, India won their first Penalty Corner and successfully converted it to score their first goal. After the injection, Captain Rohit played a smart pass to Anmol Ekka (51'), catching the German players off guard as he took a powerful shot and found the net. Germany fell back onto their defence for the remainder of the game as India did their best to find one more, but couldn't make a breakthrough again.

Next up, India will face Argentina in the 3rd/4th Place match on 10th December 2025. The final of the tournament will be played between Germany and Spain on December 10.

# FC Goa Wins Super Cup; Book Berth In AFC Champions League 2

**Hyderabad :** FC Goa held their nerve against East Bengal to win the AIFF Super Cup on a penalty shootout. The title triumph also ensured a berth for them in the AFC Champions League 2. With the victory, Manolo Marquez's team became the first side to defend the Super Cup title and win it for the record, extending the third time.

In a thrilling contest at the Jawahar Lal Nehru Stadium, the team emerged triumphant in the shootout by 6-5 to bag their second successive title in the competition played amongst the



top teams from the Indian Super League and I-League.

The match entered extra time after the match ended in a goalless draw in the regulation time. In the additional 30 minutes, none of them scored, and so the match entered the penalty shootout.

The shootout was locked in 4-4, and sudden death came into play as a result. Sahil Tavora scored the winner for Goa FC while PV Vishnu missed the target for East Bengal.

Both teams fought neck to neck in the final. The hosts began with a couple of set-piece opportunities, but East Bengal's defence negotiated those attacks successfully. East Bengal created an opportunity in the 12th minute as Miguel Ferreira pulled off a shot wide.

Bipin Singh looked threatening, but he faield to capitalise on any of the chances. Dejan Drazic also had a chance in the 49th minute, but he was flagged offside. Eventually, the match ended in a goalless draw in the regulation time, and then it was additional time. Siverio's effort for FC Goa was saved by the opposition goalkeeper Gill in the 107th minute. The East Bengal goalkeeper managed to make another save in the 114th minute.

**Goa wins Super Cup for the third time**

FC Goa is the most successful side in the history of the tournament, winning it thrice. Bengaluru, Odisha and East Bengal have won it once. They also became the first team to defend the Super Cup title.

# Shubman Gill Joins Indian Squad Ahead Of T20I Series

**Hyderabad :** After the Test and ODI series, India and South Africa are now ready to play a T20 series. The five-match T20 series is scheduled to begin on December 9th, with the first match being played at the Barabati Stadium in Cuttack. Before the match, there's good news for India as vice-captain Shubman Gill has joined the squad.

Gill was ruled out of the Test and ODI series after sustaining a neck injury in the first Test. He has now joined the T20 squad after completing his neck injury rehabilitation at the BCCI's Centre of Excellence on Sunday, December 7. In a viral video, Gill was seen sitting in the team bus with his T20 opening partner Abhishek Sharma.



**Different captains in all three formats**

Due to Gill's absence in the ongoing series against South Africa, Rishabh Pant captained the Test team, while KL Rahul led the team in the ODIs. India lost the two-match Test series 0-2 but managed to win the ODI series 2-1.

However, Suryakumar Yadav will now captain the Indian team in the T20 series. Under his captaincy, India has not lost a single series in this format so far, and the Men in Blue defeated the Proteas on their home soil in the T20 World Cup final and in a T20 series that same year.

# 11 Centuries Against 11 Nations; Caribbean Batter's Extraordinary Feat In World Cricket

**Mumbai :** Some of the batters excel against a specific opponent, scoring runs consistently. Also, they have a number of records against specific opponents, but rarely does the batter achieve a milestone against different opponents. However, Shai Hope has a special feat to his name. The West Indies batter has scored an international hundred against all 11 full-member nations. The right-



handed Caribbean batter has scored centuries in international cricket.

Hope has been the backbone of the West Indies' batting unit across formats in recent times. The Caribbean batter has amassed 6113 runs in the ODIs so far with an average of 50.52, including nineteen hundreds.

The right-handed batter has scored 2201 Test runs and 1403 T20I runs as well. The 32-year-old holds a unique feat of scoring a hundred against all other 11 full-member countries. He has also scored centuries against the Netherlands and Nepal and is he only player to score an international century against 13 different sides in international cricket. The following list includes his first international century against the five strong cricketing nations across the globe.

**First hundred against Australia (2025)**

The right-handed batter scored his first international century against Australia this year in July when he played a knock of an unbeaten 102 runs from 57 deliveries. Thanks to his stellar knock, West Indies posted 214/4 while batting first, but the opposition chased down the target with 23 balls to spare.

**First century against England (2017)**

The 32-year-old scored his maiden international hundred against England in 2017 in the Leeds Test. Notably, he scored a century in both innings of the Test match, registering scores of 147 and an unbeaten 118. His knock helped the team win the match by five wickets.

The right-handed batter played an unbeaten 123 runs to level the scores of the Indian team. In an exciting match, India posted 321/6 while batting first and then the opposition equalled it. The match was tied as a result.

# पुणे, शिर्डी, कोल्हापूर विमानतळांवरील उड्डाणं पूर्वपदावर; प्रवासी संख्येत घट, छत्रपती संभाजीनगरमधील पर्यटनाला फटका

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावर दररोज इंडिगो कंपनीच्या पाच विमानांची ये-जा असते. दिवसातून एकूण १८०० ते २००० प्रवाशांची वर्दळ या विमानतळावरून होत असते. मात्र, गेल्या काही दिवसांपूर्वी इंडिगो कंपनीची विमान सेवा अचानक विस्कळीत झाली होती. याचा सरळ परिणाम प्रवाशांच्या संख्येवर झाल्याचं शिर्डी विमानतळाचं व्यवस्थापक कृष्णा पॉल यांनी सांगितलं. तसंच कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर येथील विमानसेवाही हळूहळू पूर्वपदावर येत असल्याचं चित्र दिसत आहे.



**शिर्डीतील भाविकांना फटका** - शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून लाखो साईभक्त शिर्डीत दाखल होतात. यातील अनेक भाविक असा पर्याय निवडतात की, सकाळच्या विमानानं शिर्डीत पोहोचावं, साईदर्शन घेतल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी परतावं. सध्या शिर्डी विमानतळावर हैदराबाद येथून दोन, तर चेन्नई, बंगळुरू आणि दिल्ली येथून प्रत्येकी एक असे एकूण पाच इंडिगो विमान उड्डाणांचे आगमन व प्रस्थान नियमितपणे होतं. या पाचही विमानांद्वारे दररोज सुमारे १८०० ते २००० प्रवाशांची ये-जा होते. मात्र, काही दिवसांपूर्वी इंडिगोच्या सेवा अचानक विस्कळीत झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागला. या घटनेनंतर आता उड्डाण सेवा पूर्ववत सुरू झाली असली, तरी प्रवाशांचा कल हवाई मार्ग सोडून रेल्वेमार्गाकडं वळलेला दिसत आहे.

**प्रवासांची रेल्वेमार्गाला पसंती** - प्रवाशांना पुन्हा अनिश्चितता नको वाटल्यानं काहीजण विमानाऐवजी रेल्वेचा पर्याय स्वीकारताना दिसून येत आहेत. विमान कंपनीची सेवा विस्कळीत होणे किंवा कोणतीही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास प्रवाशांना याबाबत त्वरित माहिती देण्यात येते, असंही विमानतळ व्यवस्थापक कृष्णा पॉल यांनी स्पष्ट केलं.

**पुणे विमानतळावरुन विमानसेवा सुरळीत** - पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनानं दिलेल्या माहितीनुसार, पुणे विमानतळ येथील सर्व दहा एअरक्राफ्ट पार्किंग बे सध्या रिक्त आहेत. इंडिगोचं कोणतंही विमान किंवा इतर कोणतंही विमान एप्रनवर अडकलेलं नाही. सर्व विमान कंपन्या त्यांच्या मंजूर वेळापत्रकानुसार कार्यरत आहेत. आगमन, निर्गमन किंवा ग्राउंड हँडलिंगवर कोणताही परिणाम नाही.

**कोल्हापुरातील विमानसेवा संथगतीनं** - बंगळुरु-हैदराबाद-कोल्हापूर मार्गावरील विमान वाहतूक गेल्या चार दिवसांपासून संथगतीनं सुरू होत. आता ही सेवाा सुरळीत सुरू झाली आहे. देशातील अनेक विमानतळांवरून होणारी उड्डाणं रद्द झाल्यामुळं याचा फटका विमान प्रवासाला बसला असून, प्रवाशांच्या संख्येत घट झाली आहे. केंद्र सरकारनं कारवाईचा बडगा उगारल्यानंतर येत्या पंधरा दिवसात वेळापत्रकानुसार विमानसेवा सुरू होईल, असं आश्वासन कंपनीकडून देण्यात आलं आहे. कोल्हापुरातील विमानसेवाही येत्या काही दिवसात पूर्ववत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**विमानसेवा पुन्हा सुरळीत** - कर्नाटक, गोवा आणि कोकणाला जोडणारं मध्यवर्ती शहर म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. इंडिगो, स्टारएअरलाइन्स, जेटया कंपन्यांकडून कोल्हापूर विमानतळावर हवाई वाहतूक सेवा पुरवली जाते. कोल्हापुरातून मुंबई, हैदराबाद, बंगळुरु या देशातील मोठ्या शहरांकडं विमानांच्या दिवसातून सहा फेऱ्या होतात, प्रत्येक विमानातून सरासरी ६५ प्रवासी प्रवास करत असल्याचं विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आलं. इंडिगो कंपनीच्या विमानांची उड्डाणं रद्द झाल्यानंतर पहिल्या दिवशी बंगळुरु आणि हैदराबादवरून कोल्हापुरात येणाऱ्या विमानांच्या वेळेत बदल झाला. मात्र, त्यानंतर गेली तीन दिवस हैदराबाद-बंगळुरु-कोल्हापूर मार्गावरील विमानसेवा सुरळीत झाली असल्याचं इंडिगो कंपनीचे कोल्हापूर विमानतळावरील सुरक्षा अधिकारी नारायण पाटील यांनी सांगितलं.

**प्रवासी संख्येत १५ टक्क्यांनी घट** - कोल्हापुरातून तिरुपती-हैदराबाद-मुंबई- बंगळुरुकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे, इंडिगो कंपनीच्या एका विमानातून सरासरी ६५ प्रवासी प्रवास करतात. मात्र, गेल्या चार दिवसात या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. वेळापत्रक कोलमडल्यामुळे याचा फटका प्रवाशांना बसत आहे.

**छत्रपती संभाजीनगरमधील पर्यटनावर पन्नास टक्के परिणाम** - विस्कळीत विमानसेवेचा फटका पर्यटनस्थळांना बसला आहे, राज्याचा विचार करता जवळपास शंभर कोटींचा आर्थिक फटका बसल्याची भीती व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. येणारे पर्यटक विमानसेवा निश्चित नसल्याने आपला दौरा रद्द करत आहेत, तर विदेशातून आलेल्या पर्यटकांचे नियोजन खराब होणार असल्याने पर्यायी व्यवस्था ते शोधत आहेत. काही ठिकाणी कनेक्टिंग विमानसेवा घेत आहेत, तर कुठे रस्ते प्रवास पर्यायी व्यवस्था म्हणून घेत आहेत. मात्र, या सेवा देताना त्याचा भुर्दंड पर्यटन व्यावसायिकांना बसत असल्याची खंत 'औरंगाबाद टुरिझम डेव्हलमेंट फाउंडेशन'चे अध्यक्ष जसवंत सिंग यांनी व्यक्त केली.

## महिलांना सक्षम करणारी 'भीमथडी जत्रा' यंदा नव्या रूपात पुणेकरांच्या भेटीला येणार, सुनंदा पवार यांची माहिती

● पुणे, शकील शेख :

ग्रामीण भागातील महिला बचत गटांसह महिला उद्योजिका यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी, या हेतूनं सुरू करण्यात आलेली 'भीमथडी जत्रा' यंदा नव्या रूपात पुणेकरांच्या भेटीला येणार आहे. ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, भीमथडी फाऊंडेशन व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या सयुंक्त विद्यमानं येत्या २० ते २५ डिसेंबर या कालावधीत सकाळी १० ते रात्री १० या वेळेत कृषी महाविद्यालय मैदान शिवाजी नगर (सिंचन नगर) याठिकाणी यंदाची



भीमथडी जत्रा होणार असल्याची माहिती आयोजक सुनंदा पवार यांनी दिली. यंदाच्या भीमथडी जत्रेबाबत आज (८ डिसेंबर) पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी याबाबत माहिती दिली.

सुनंदा पवार म्हणाल्या की, "ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, ही संस्था गेली पाच दशकं कृषी, शिक्षण, जलसंधारण, प्रशिक्षणे, महिला बचत गट, महिला सबलीकरण यासह कृत्रिम बुद्धिमत्ता अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्य करीत आहे. यापैकीच एक सामाजिक उपक्रम म्हणजे 'भीमथडी जत्रा'. ग्रामीण भागातील महिला बचत गटांसह महिला उद्योजिका यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी, या हेतूनं संस्थेच्यावतीनं गेली १८ वर्ष या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केलं जात आहे. यंदा या उपक्रमाचं १९वं वर्ष आहे. यंदा नव्या रूपात ही जत्रा होणार आहे. या वर्षीच्या भीमथडीची 'भारतातील स्थानिक फुलं' ही थीम असल्यामुळं भीमथडीच्या माध्यमातून देशाच्या स्थानिक वनस्पतींचं जतन केलं जाईल. अर्बन /किचन गार्डनिंगमध्ये लहान जागेत, कमी खर्चात विषमुक्त भाजीपाला उत्पादन घरच्या घरी बनविता येईल. याचं प्रात्यक्षिक पुणेकरांना यंदा पहावयास मिळेल," असं सुनंदा पवार यांनी सांगितलं.

पुढं सुनंदा पवार म्हणाल्या की, "या वर्षी भीमथडी जत्रेत प्रवेश करतानाच ग्राहकांचे मुघल बागेच्या सौंदर्यावर आधारित फुलांनी सजविलेल्या भव्य प्रवेश द्वारावर स्वागत केलं जाईल. यंदाची भीमथडी जत्रा १९व्या वर्षात पदार्पण करत असून महाराष्ट्राच्या कला संस्कृतीचं दर्शन घडविणारे कलाकार व त्या कलाकारांचं रेखाटन असलेलं भव्य व सुंदर रांगोळी स्थानिक कलाकारांच्या कलेतून साकारण्यात येईल. तसंच भीमथडी प्रदर्शनामध्ये मिलेट उत्पादनासह विषमुक्त भाजीपाला, भौगोलिक मानांकन (जीआय) असलेले पदार्थ तसंच महिला सबलीकरणाला केंद्र स्थानी ठेऊन ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी बनविलेल्या हस्तकला, उन्हाळी पदार्थ, चटण्या, मसाले, लोणचं, मेथी मलाई, प्री मिक्स मिलेट चिवडा, मातीची भांडी, बेल मुरांबा, खजूर लोणचं, हळदीचं लोणचं, कपडे यांसह विविध उत्पादनं विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.


## भारतातील रस्त्याला चक्क डोनाल्ड ट्रम्प यांचं नाव; 'या' राज्याची मोठी घोषणा

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने हैदराबादमधील अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासालगतच्या रस्त्याचे नामकरण करण्याचा प्रस्ताव तेलंगणा सरकारने रविवारी (७ डिसेंबर) मांडला आहे. यानुसार, हा हाय-प्रोफाइल रस्ता 'डोनाल्ड ट्रम्प अव्हेन्यू' म्हणून ओळखला जाईल.

मुख्यमंत्री कार्यालयाने (CMO) जारी केलेल्या निवेदनानुसार, या निर्णयाची माहिती राज्य सरकार लवकरच केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाला आणि अमेरिकन दूतावासाला अधिकृतरित्या देणार आहे.

रतन टाटा, गूगल,



**मायक्रोसॉफ्ट, विप्रो यांच्याही नावाने रस्ते**


याशिवाय राज्य सरकारने रविर्याल येथील नेहरू आउटर रिंग रोडला प्रस्तावित प्रादेशिक रिंग रोडशी जोडणाऱ्या आगामी ग्रीनफिल्ड रॅडिअल रोडला दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला आहे. रविर्याल इंटरचेंजला यापूर्वीच 'टाटा इंटरचेंज' असे नाव देण्यात आले आहे.

गेल्या महिन्यात दिल्लीत झालेल्या यूएस–इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम (USISPF) परिषदेत मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी हैदराबादमधील काही प्रमुख रस्त्यांना जागतिक कंपन्यांच्या नावाने ओळख देण्याचा प्रस्ताव सुचवला होता. त्यानुसार, सरकारने आता येथील महत्त्वाचा रस्ता 'गूगल स्ट्रीट' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. गूगलचे आगामी कॅम्पस-जे अमेरिकेबाहेरील सर्वांत मोठे कॅम्पस असणार आहे-तो रस्ता 'गूगल स्ट्रीट' नावाने ओळखला जाईल. मायक्रोसॉफ्ट आणि विप्रोलाही 'मायक्रोसॉफ्ट रोड' आणि 'विप्रो जंक्शन' या स्वरूपात शहराच्या नकाशावर स्थान देण्यात येणार आहे. राज्यातील काही अन्य नामवंत व्यक्ती आणि कॉर्पोरेटसाठीही रस्त्यांची नावे समर्पित करण्याचा प्रस्ताव आहे.

## 'कॅबला उशीर झाला, म्हणून ...'; गोव्याच्या नाइट क्लबमधील अग्निकांडातून थोडक्यात बचावलेल्या युवकाने सांगितली आपबिती

● नवी दिल्ली, वार्ताहर :

शनिवारी (दि.६) मध्यरात्री उत्तर गोव्यातील अर्पोरा येथील बर्च बाय रोमिओ लेन क्लब (Birch by Romeo Lane) नाईट क्लबमध्ये भीषण आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेत ६ जण गंभीर जखमी झाले. सोमवारी (दि.८) गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले असून आठवडाभरात त्याचा अहवाल सादर केला जाणार आहे. या घटनेतील ५ आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. अशातच, या दुर्घटनेत एक कॅब चालक थोडक्यात वाचला. माध्यमांशी



बोलताना त्याने आपबिती सांगितली.

दिल्लीतील डॉ. अवनीश हे या दुर्दैवी घटनेच्या रात्री क्लबला जाण्याचा प्लॅन करत होते. त्यांनी सांगितले, "खरं तर आम्ही थोडक्यात वाचलो. आमचा कॅब ड्रायव्हर उशिरा आला, नाहीतर आम्हीही तिथेच असतो."

**"माझे दोन पुतणे गेले...**

मृतांपैकी दोन जणांचे नातेवाईक असलेलले नारायण माथुर म्हणाले, "ही दोन्ही माझ्या मोठ्या भावाची मुलं होती. ते दोघेही रेस्टॉरंटच्या किचनमध्ये काम करत होते. आज सकाळी या दुर्घटनेची माहिती मिळाली. आमचा एक शेजारीही या आगीत मरण पावला. आम्ही सगळे झारखंडचे रहिवासी आहोत."

**२५ जणांचा मृत्यू; ७ जणांची ओळख अनुत्तरित**

या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाला आहे. ज्यात ४ पर्यटक आणि १४ कर्मचारी यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. उर्वरित ७ जणांची ओळख अद्याप पटलेली नाही. जखमींवर जवळच्या गोवा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत. आगीचे नेमके कारण अजून स्पष्ट झाले नाही.

## खंबाटकी घाटातील एस कॉर्नरवर भरधाव ट्रकची सात वाहनांना धडक, पळून जाणाऱ्या चालकाला पोलिसांनी पकडलं

● सातारा, दिगंबर जाधव :

ब्रेक निकामी झालेल्या एका कंटेनरने नवले पुलावर अनेक वाहनांना धडक दिल्याची बातमी ताजी असतानाच सातारा-पुणे मार्गावर रविवारी रात्री भरधाव ट्रकने सात चारचाकी वाहनांना धडक दिलीय. या अपघातात सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. मात्र, काही वाहन चालक किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच वाहनांचं मोठं नुकसान झालंय.



**अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक विस्कळीत** : खंबाटकी घाटातल्या बोगद्यानंतर येणाऱ्या 'एस' आकाराच्या वळणावर हा अपघात झाला. अपघातानंतर पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. वीकेंडची सुट्टी संपल्याने महामार्गावर पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढली असतानाच हा अपघात झाला. मात्र, सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

**वाहनांचे नुकसान, अनेक जण किरकोळ जखमी** : घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, खंबाटकी घाटातील बोगद्यातून बाहेर आल्यानंतर साताऱ्याकडून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या मार्गिकेवर एका मालट्रकने सात वाहनांना धडक दिली. खंबाटकी घाटातील एस कॉर्नरवर रविवारी रात्री हा अपघात झाला. सुदैवानं यात कुणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. मात्र, वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, काही चालक किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांना खंडाळा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**चालकाचा पळून जाण्याचा प्रयत्न** : सातारा-पुणे मार्गावरल खंबाटकी घाटात असलेला एस कॉर्नर हा अपघाताचा ब्लॅक स्पॉट आहे. यापूर्वी याठिकाणी अनेक भीषण अपघात झाले आहेत. रविवारी रात्री पुन्हा याठिकाणी भीषण अपघात झाला. या अपघातानंतर मालट्रक चालकाने घटनास्थळावरून पलायन केले होते. मात्र, खंडाळ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष म्हस्के यांच्या पथकाने त्याला शिताफीने ताब्यात घेतले.

## विधानसभेसह विधानपरिषदचे कामकाज स्थगित; आज सकाळी सुरू होणार कामकाज

● नागपूर, नितीन देवळेकर :

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनचा काल पहिला दिवस होता. बहुधा पहिल्यांदाच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेते नसताना विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन होत आहे. अशा परिस्थितीत विरोधी पक्षांनी विरोधी पक्षनेतेपदाची महायुती सरकारकडं मागणी केली. त्यावर मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले, "विरोधी पक्षनेतेपदासाठी त्यांच्याकडं पुरेसे संख्याबळ नाही. भास्कर जाधव यांनी कोणी विरोधी



पक्षनेतेपद करेल, असे वाटत नाही, असा त्यांनी विरोधकांना टोला लगावला.

शोक प्रस्तावानंतर विधानसभा आणि विधानपरिषदचे कामकाज स्थगित करण्यात आलं आहे. विधानसभेचं कामकाज मंगळवारी सकाळी १० वाजता सुरू होणार आहे. तर विधानपरिषदेचं कामकाज मंगळवारी ११ वाजता कामकाज सुरू होणार होणार आहे.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आजपासून उपराजधानी नागपूर येथे सुरू होत असून अधिवेशन १४ तारखेपर्यंत सुरू राहणार आहे. पहिल्या दिवशी पुरवणी मागण्या मांडल्या जाणार आहेत. एकूण १८ विधेयके सभागृहात मांडणार आहेत. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं बोलाविलेल्या चहापानावरही विरोधी पक्षानं बहिष्कार टाकला. या अधिवेशनात शेतकरी कर्जमाफी, अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत याबाबत घोषणा करण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा सहभाग असलेल्या कथित जमीन घोटाळ्याच्या मुद्द्यांवर विरोधकांकडून गदारोळ होण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदे यांची विरोधकांवर टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी माध्यमांशी बोलताना विरोधी पक्षांवर टीका केली. " जनतेनं त्यांना आधीच नाकारलं आहे. विरोधी पक्षांनी चालू हिवाळी अधिवेशनात विदर्भाशी संबंधित मुद्दे उपस्थित करण्यावर लक्ष केंद्रित करावे", असा त्यांना टोला लगावला.नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधी पक्षांनी आरोप करण्याऐवजी या भागातील प्रश्नांना प्राधान्य द्यावे. त्यांनी सभागृहात उपस्थित राहून विदर्भातील लोकांना न्याय मिळवून द्यावा. ते २०१४ पूर्वी तिथे होते. त्यामुळे २०१४ पूर्वीची परिस्थिती पाहा. ते फक्त आरोप टीका करतात.त्यांनी आत्मपरीक्षण करावं- महाविकास आघाडीवर टीका करताना उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, "लोकप्रतिनिधी होण्यासाठी तुम्हाला लोकांच्या समस्या सोडवाव्या लागतात. विदर्भात होणाऱ्या या अधिवेशनात त्यांनी विदर्भातील जनतेचे प्रश्न सभागृहात मांडले पाहिजेत. जनतेनं तुम्हाला नाकारलं आहे. गेल्या लोकसभेतही त्यांची संख्या कमी होती. त्यांना लोकप्रतिनिधी मिळाला नाही." विरोधी पक्षांना लक्ष्य करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "जनतेनं त्यांना नाकारलं असल्यानं त्यांनी आत्मपरीक्षण करावं. मी लोकांसाठी काम करत असून त्यांची सेवा करत आहे. ते आरोप करत आहेत. जनता सर्वात महत्वाची आहे."

विरोधी पक्षनेतेबाबतचा निर्णय अध्यक्ष- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, सत्ताधारी महायुती आघाडीला विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीबाबत कोणताही आग्रह किंवा पूर्वग्रह नाही. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे अध्यक्ष हे विरोधी पक्षनेत्याबाबत निर्णय घेतील. त्यांनी घेतलेला निर्णय आम्ही स्वीकारणार आहोत. सध्याचा विरोधी पक्ष दिशाहीन आहे. त्यांच्याकडे मुद्दे नाहीत. मुद्दे पुढे चालविण्याची त्यांची इच्छाशक्ती नाही.